# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - १६७ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ सोमवार दि. २८ जुलै २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६


# शत्रूची किती विमाने पाडली हे त्यांनी कधीच विचारले नाही

## राजनाथ सिंह यांचा लोकसभेत राहुल गांधींवर निशाणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८नवी दिली**

आज संसदेच्या पावसाळी अधिवेशनात पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरवर चर्चा सुरू झाली. केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज सरकारची बाजू मांडली आणि विरोधकांचे सर्व आरोप आणि टीका खोडून काढल्या. डोनाल्ड ट्रम्प यांच्या दबावामुळे नाही, तर पाकिस्तानच्या विनंतीमुळे युद्धविराम मान्य केल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, भारतीय सैन्याचे किती विमान पाडले? या विरोधकांच्या प्रश्नालाही राजनाथ सिंह यांनी सडेतोड उत्तर दिले.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले, २२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू-काश्मीरच्या पहलगाम भागात एक अमानवी आणि भ्याड दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात एका नेपाळी नागरिकासह आपल्या २५ निष्पाप नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले. त्या निष्पाप पर्यटकांना धर्म विचारून मारले, हे अमानुषतेचे सर्वात घृणास्पद उदाहरण आहे. ही घटना भारताच्या सहनशीलतेची मर्यादा होती. त्यामुळेच आम्ही ऑपरेशन सिंदूरद्वारे



पाकिस्तानला एक कडक संदेश दिला. हे ऑपरेशन अजून संपलेले नाही. यापुढे पाकिस्तानकडून कोणत्याही प्रकारचे कट रचले गेले, तर ऑपरेशन सिंदूर पुन्हा सुरू होईल आणि पाकिस्तानला त्यांच्याच भाषेत उत्तर दिले जाईल.

राजनाथ सिंह पुढे म्हणतात, विरोधी पक्ष विचारत आहेत की, पाकिस्तानी सैन्याने आपली किती विमाने पाडली? हा प्रश्न जनतेच्या भावनांचे योग्य प्रतिनिधित्व करत नाही. त्यांनी आम्हाला कधीही हे विचारले नाही की, आपल्या सैन्याने शत्रूची किती विमाने पाडली? जर त्यांना प्रश्न विचारायचे असतील, तर त्यांनी ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाले का? हे विचारावे. याचे तर उत्तर हो, असे आहे. जेव्हा ध्येय मोठी असतात, तेव्हा लहान मुद्द्यांकडे लक्ष वळवू नये. जर विरोधी पक्षाचे मित्र ऑपरेशन सिंदूरवर योग्य प्रश्न विचारू शकत नसतील, तर त्याला मी काही करू शकत नाही. मी चार दशकांहून अधिक काळापासून राजकारणात आहे. मी कधीही राजकारणाकडे प्रतिकूल दृष्टिकोनातून पाहिले नाही. आज आम्ही सत्ताधारी पक्षात आहोत, पण कायम राहणार नाही. जेव्हा जनतेने आम्हाला विरोधी पक्षात बसण्याची जबाबदारी सोपवली होती, तेव्हा आम्ही ती सकारात्मक पद्धतीने पार पाडली. १९६२ मध्ये चीनशी झालेल्या युद्धाचा दुःखद परिणाम झाला, तेव्हा आम्ही विचारले होते की, आपली जमीन दुसऱ्या देशाने कशी ताब्यात घेतली. लष्कराचे जवान कसे मारले गेले. आम्ही युद्धसामग्री आणि बंदुकांची चिंता नव्हती, तर देशाच्या कल्याणाची काळजी होती. १९७१ मध्ये जेव्हा पाकिस्तानला धडा शिकवला, तेव्हा आम्ही राजकीय आणि लष्करी नेतृत्वाचे कौतुक केले. अटलबिहारी वाजपेयी संसदेत उभे राहून त्यावेळच्या नेतृत्वाचे कौतुक केले होते. तेव्हाही आम्ही सैन्याच्या शौर्यावर प्रश्न उपस्थित केले नाही. अधिक व्यावहारिक भाषेत सांगायचे तर, परीक्षेचा निकाल महत्त्वाचा असतो. परीक्षेदरम्यान पेन्सिल तुटली, पेन संपला, हे महत्वाचे नसते. आपल्या सैन्याने ऑपरेशन सिंदूर दरम्यान निश्चित केलेले लक्ष्य पूर्णपणे साध्य केले आहे, असेही राजनाथ सिंह यांनी ठणकावून सांगितले.

**भारताने कारवाई का थांबवली?**

भारताने ऑपरेशन सिंदूर थांबवले, कारण आम्ही ठरवलेले सर्व लक्ष्य साध्य केले होते. कोणत्याही दबावाखाली भारताने ही कारवाई थांबवली, असे मानणे पूर्णपणे चुकीचे आहे. ऑपरेशन सिंदूर सुरू करण्याचा उद्देश पाकिस्तानमध्ये वर्षानुवर्षे वाढलेल्या दहशतवादी नर्सरी नष्ट करणे हा होता. आमच्या सैन्याने फक्त त्यांनाच लक्ष्य केले. या कारवाईचा उद्देश युद्ध करणे नव्हता. १० मे रोजी सकाळी जेव्हा भारतीय हवाई दलाने पाकिस्तानी हवाई तळावर हल्ला केला, तेव्हा पाकिस्तानने पराभव स्वीकारला. पाकिस्तानने आपल्या डीजीएमओशी बोलून युद्ध थांबवण्याची विनवणी केली, त्यामुळेच आम्ही कारवाई थांबवली, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुतीत एकत्र लढायच्या - देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २८वर्धा**

राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील. सुरुवातीला जिल्हा परिषदेची निवडणूक आणि त्यानंतर नगरपालिकेची निवडणूक होईल आणि कदाचित सर्वात अखेरीस महापालिकेची निवडणूक होईल. या निवडणुका आपण महायुतीमध्ये एकत्र लढणार आहोत. स्थानिक स्तरावर काही निर्णय घेण्याचे अधिकार आम्ही देऊ. जिथे अडचणी असतील तेथील लोकांना आमच्याशी चर्चा करावी.पण शक्यतो निवडणुका महायुतीत करायच्या ,जिथे महायुतीत निवडणूक होणार नाही, तिकडे आपल्या मित्रपक्षावर कुठलीही टीका करायची नाही. आपण राज्यात सोबत काम करत आहोत, त्यामुळे आपल्या मित्रपक्षांवर टीका करायची नाही. आपण २०१७ साली बघितलं, उद्धवजी आपल्यासोबत सत्तेत होते, रोज आपल्यालाच शिव्या द्यायचे, ते आपल्याला करायचे नाही. महायुती होणार नाही तिथे आपल्याला समन्वय ठेवून मैत्रीपूर्ण लढत करायची आहे. पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्या भाजपचं निर्विवाद वर्चस्व दाखवून द्यायचं आहे, असा आदेश मुख्यमंत्री देवेंद्र




फडणवीस यांनी भाजपच्या कार्यकर्त्यांना दिला. ते सोमवारी वर्धा येथे आयोजित करण्यात आलेल्या भाजप कार्यकर्त्यांच्या महामंथन मेळाव्यात बोलत होते.

माझी एक विनंती आहे की, राज्यात आपल्यासाठी अनुकूलता आहे. लोक आपल्याला निवडून द्यायला तयार आहेत. पण भाजप पार्टी म्हणून अनेक जिल्ह्यात लहानसहान वाद आहे, हे वाद नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये आहेत. हे फार मोठे वाद नाहीत. भाजप हा परिवार आहे, दोन भावांमध्ये कमी अधिक होत असतं. पण निवडणुकीच्या तोंडावर सगळ्यांनी एकत्र राहिलं पाहिजे, बसलं पाहिजे, वाद संपवले पाहिजेत. बघा, अनेक पाट्यांचं पतन याकरता झालं, एकाने दुसऱ्याला ओढलं आणि दुसऱ्याने पहिल्याला ओढलं आणि दोघांनी मिळून पार्टीला खड्यात घातलं. अशाप्रकारे आपल्या पार्टीत होता कामा नये. कोणी जर पार्टीला खड्ड्यात घालण्याचं काम करत असेल तर त्याला खड्ड्यात घालण्याचं काम पार्टी करेल एवढं लक्षात ठेवा, असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी दिला. एक गोष्ट लक्षात ठेवा, आपल्याला अनुकुलता आहे. सध्या आपल्या पक्षात सगळीकडे कार्यकर्ते उपलब्ध आहेत. याचं मोठं उदाहरण म्हणजे यापूर्वी शिवसेनेच्या नावावर एका दिवसात रक्तदान शिबिरात २५ हजार बाटल्या करण्याचा विक्रम होता. पण २२ जुलैला आपल्या अध्यक्षांनी आदेश दिल्यावर भाजपच्या कार्यकर्त्यांनी इतकं रक्तदान केलं की, एका दिवसात रक्ताच्या ७८ हजार बाटल्या गोळा झाल्या. आपण मनावर घेतल्यावर काय करु शकतो, हे याचं उत्तम उदाहरण आहे, हे देवेंद्र फडणवीसांनी अधोरिखित करण्याचा प्रयत्न केला.

## पहलगाम हल्ल्यातील दहशतवादी मुसा मारला गेल्याची शक्यता, तीन दहशतवादी ठार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८श्रीनगर**

श्रीनगरच्या लिडवास भागात, सुरक्षा दलांनी 'ऑपरेशन महादेव' अंतर्गत एक मोठी कारवाई केली. या कारवाईत सैन्याला मोठे यश आले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मास्टरमाइंड मुसा याच्यासह अन्य दोन टीआरएफच्या दहशतवाद्यांना ठार मारल्याची माहिती समोर आली आहे. ही कारवाई लष्कर आणि जम्मू-काश्मीर पोलिसांच्या संयुक्त पथकाने केली. हे दहशतवादी सापडले तेव्हा सुरक्षा दल आधीच परिसरात शोध मोहीम राबवत होते.

लिडवास हा श्रीनगरच्या बाहेरील भागात घनदाट जंगलाचा परिसर आहे. हा डोंगराळ मार्गाने त्रालला जोडतो. या भागात यापूर्वीही टीआरएफच्या दहशतवादी कारवायांच्या बातम्या आल्या आहेत. ही कारवाई लष्कराच्या चिनार कॉर्प्सकडून सुरू आहे. यामध्ये पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेल्या तीन दहशतवाद्यांना ठार मारल्याचा दावा करण्यात आला आहे.

दरम्यान, दाचिगम जंगलाच्या वरच्या भागात सीआरपीएफ आणि जम्मू-काश्मीर पोलिसांची संयुक्त कारवाई अजूनही सुरू आहे. हा तोच परिसर आहे



जिथे जानेवारीमध्ये टीआरएफचा एक लपण्याचा अड्डा उद्ध्वस्त करण्यात आला होता. या ठिकाणी दोन दिवसांपूर्वी संशयास्पद हालचाली आढळून आल्या होत्या.

**जंगलात अजूनही दहशतवादी लपल्याचा संशय**

सोमवारी दाचिगाममध्ये शोध मोहिमेदरम्यान अचानक गोळीबार झाला, यामुळे परिसरात तणाव निर्माण झाला. यानंतर सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला आणि कारवाई तीव्र केली. या परिसरात आणखी टीआरएफ दहशतवादी अजूनही जंगलात लपल्याचा संशय लष्करांना आहे.

## कलंकित, भ्रष्टाचारी मंत्री, आमदारांना बडतर्फ करा

### उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेची राज्यपालांकडे मागणी, आरोपांचा पाढाच वाचला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८मुंबई**

सत्ताधारी पक्षांमधील कलंकित, भ्रष्टाचारी आणि असंवेदनशील मंत्री तसेच आमदार यांना ताबडतोब बडतर्फ करायला हवे, अशी मागणी आम्ही राज्यपालांकडे केली असल्याचे विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी केली आहे. ठाकरे गटाच्या नेत्यांनी आज राज्यपालांची भेट घेऊन या मागणीचे निवेदन दिले. सरकार त्यांच्या नेत्यांना पाठीशी घालत असून राज्यपाल कारवाई करतील अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्यांच्याकडूनही न्याय मिळाला नाही तर आम्ही जनतेच्या दरबारात जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.या संबंधी विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी सांगितले की, राज्यपाल महोदयांची आमच्या




शिष्ट मंडळाने भेट घेतली आहे. राज्यातील मंत्र्यांचे भ्रष्टाचारी वर्तन आहे. तसेच विधानसभेतील आमदारांचे देखील वर्तन कलंकित करणारे आहे, असा आरोप दानवे यांनी केला आहे. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकरी यांच्या विषयी गैर-उद्गार काढले आहेत. हेच मंत्री लोकशाहीच्या मंदिरामध्ये रम्मी खेळताना आढळलेले असल्याचा आरोपही त्यांनी केला.

दुसरीकडे राज्याच्या गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्या आईचे नाव असलेल्या बारमध्ये २२ बार बाला पकडल्या गेल्या आहेत. राज्याचे गृह राज्यमंत्रीच अनैतिक डान्सबार चालवत आहेत. त्यांचा प्रकार त्यांचेच पोलिस पकडतात. तरी देखील राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री झोपलेले आहेत का? असा सवाल दानवे यांनी उपस्थित केला.

## खते,बियाणे 'एमआरपी'पेक्षा जादा दराने विक्री

### कृषी विभागाचे दुर्लक्ष; शासन दर फक्त कागदावरच, प्रत्यक्षात शेतकऱ्यांची आर्थिक लूट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

पेरणीचा हंगाम सुरू असून, शेतकरी जीवाचे रान करत असताना पेरणीच्या आधी बियाण्याच्या नावाखाली आता खत खरेदीच्या नावाखाली चोहोट्टा बाजार परिसरातील शेतकऱ्यांची उघडपणे आर्थिक लूट सुरू आहे. शासनाने ठरवलेल्या 'एमआरपी'' दरांकडे दुर्लक्ष करून दुकानदार मनमानी भाव आकारत आहेत.

पक्क्या पावत्याशिवाय, हमीशिवाय आणि कोणतीही जबाबदारी न घेता. पहिले बियाणे ला तर आता खतं आणि जास्तीत जास्त दराने विक्री केले जात आहे. हे सगळे कृषी विभागाच्या दुर्लक्षामुळे सुरू असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. मात्र कृषी विभागाकडून कोणतीही कारवाई होत नाही. ही चोहोट्टा बाजार परिसरातील एका शेतकऱ्याने व्यक्त केलेली खंत आज तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बेदनांचे जिवंत प्रतिक बनली आहे. सध्या पेरणीचा हंगाम सुरू असून, शेतकरी खतांसाठी धावपळ करत आहेत.. मात्र, शासनाने जाहीर केलेल्या दरांना धाब्यावर बसवत आहेत.



**कृषी सेवा केंद्राकडून शेतकऱ्यांची आर्थिक लूट**

दरवर्षी आम्हा शेतकऱ्यांची कृषी सेवा केंद्राकडून उघडपणे आर्थिक लूट केली जाते. शासनाने दर ठरवले तरी प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही. युरियाचे दर २६६ रुपये असताना ३५० रुपयाला मिळतो. एक दोन एकरच्या शेतकऱ्यांना खते मिळत नाही.खत उपलब्ध असतानाही दिल्या जात नाही. कृषी विभागाच्या दुर्लक्षामुळे हे होत आहे. त्यांनी जर मनावर घेतले, तर ही मनमानी लगेच थांबेल.

**प्रकाश साबळे शेतकरी**

कृषी विभागाच्या दुर्लक्षामुळेच खते व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांची लुट सुरू केली आहे. शासकीय दरापेक्षा अधिक दराने खते, विक्री होत आहेत यामध्ये. काही.व्यापाऱ्यांकडून खुलेआम एमआरपीपेक्षा २०० ते ३५० रुपयेच्या अधिक दराने खतांची विक्री केली जात आहे. डीएपी खताचा शासन दर १३५० रुपये असताना, प्रत्यक्षात त्यासाठी १६०० ते १७०० पर्यंत वसुली केली जाते. युरिया २६६ रुपये ५० पैशाऐवजी ३५० रुपयांपर्यंत विकले जात आहे. ही दरवाढ सर्रासपणे होत. असून शेतकऱ्यांना पक्की बिलंही दिली जात नाहीत. खते, बियाणे घेतल्यानंतर शेतकऱ्यांनी बिले मागितल्यास त्यांना ते मिळत नाहीत. बिले दिली तर शेतकरी बोगस बियाणबाबत जाब विचारायला येतील, या भीतीपोटी व्यापारी पक्की बिले देत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

केवळ खतचं नव्हे, तर बियाण्यांच्या विक्रीतही मनमानी सुरू होती,दराबाबत विचारणा केल्यास शेतकऱ्यांना 'बियाणे संपले' असा खोटा बहाणा केला जात होता. आता युरिया खतांसाठी त्रास होत आहे. आणि दबावाखाली आणले जाते., यासंदर्भात शेतकऱ्यांनी वारंवार कृषी विभागले कळवले असून सुद्धा कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. असे काही शेतकऱ्यांचे म्हणणे. आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी जिल्हा कृषी अधीक्षक, लक्ष देतील का? होणारा काळाबाजार थांबवणार का..? दुकानदारांवर कारवाई करणार, असा प्रश्न उपस्थित केला जातो.



## संपादकीय ......

# मद्यसेवनापेक्षाही ऑनलाईन गेम्सची नशा घातक!

*काही दिवसांपूर्वी राज्याचे कृषीमंत्री ऑनलाईन रमीचा गेम खेळत होते,असा आरोप झाला. कृषीमंत्र्यांचा रमी खेळतानाचा व्हिडीओ महाराष्ट्रभर व्हायरल झाला. तर, या सर्व आरोपांवर स्पष्टीकरण देताना, मी गेम खेळत नव्हतो,तर आलेली रमीची जाहिरात स्कीप करत होतो, असे कृषीमंत्र्यांनी म्हटलं आहे. अजून काही दिवस या रमी प्रसंगाबाबत ऑनलाईन आणि ऑफलाईन चर्चा झडत राहील, काही दिवसांनंतर इतर विषयांप्रमाणे ही चर्चा देखील काळाच्या पडद्या आड जाईल. पुन्हा असाच काही विषय आला, की पुन्हा ही चर्चा सुरू होईल, परंतु, ऑनलाईन रमीसारखे गेम्स आणि ऑनलाईन बेटिंग कशा प्रकारे समाजाला गुंतवत आहेत आणि उद्धवस्त करत आहेत, हे स्पष्टरित्या समोर कधीच येणार नाही. त्यावर प्रकाशदेखील वारंवार टाकला जाणार नाही. परंतु, लखपती, करोडपती बनवण्याचे आमिष दाखवून ऑनलाईन रमी आणि इतर बेटिंग ॲप्स कशा प्रकारे एखाद्या व्यक्तीच्या आर्थिक, शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्थितीवर परिणाम करत आहेत, हे समजून घेणे आता महत्वाचे झाले आहे. तो टप्पा आता आलाय. अगदी २००६ पासून सुरू झालेला ऑनलाईन रमीचा हा व्यवसाय आता संपूर्ण भारतभर फोफावला असून त्याद्वारे किती खेळाडू लखपती, करोडपती झाले याची माहिती नाही, पण अधिकाधिक लोक हे कर्जबाजारीच झाले आहेत, अशी आकडेवारी आहे.*

*गेल्या १५ ते २० वर्षांपासून सुरू झालेल्या या ऑनलाईन रमीच्या मायाजालाला अनेकजण भुलले आहेत. त्याचा परिणाम समाजात हळूहळू दिसू लागला आहे. अनेकजण यात मोठ्या प्रमाणात आर्थिक संकटाला सामोरे गेले आहेत. ज्याची माहिती ते समाजासमोर येऊन देऊ शकत नाहीत. त्याची लाज त्यांना वाटते, तर काहीजण उघडपणे आपली चूक कबूल करताना दिसत आहेत. सोलापूरमधील करमाळा तालुक्यातील जाधव नावाचे गृहस्थ त्यांपैकीच एक. ज्यांनी काही दिवसांपूर्वीच आपण ऑनलाईन रमीच्या गेमपायी कसे वाहवत गेलो आणि आपल्या डोक्यावर कशा प्रकारे ८० लाखांहून जास्त रकमेचे कर्ज झाले, याचे कथन केले आहे. ते म्हणतात की, मित्रांच्या माध्यमातून मला या ऑनलाईन रमी गेम्सबद्दल माहिती मिळाली. त्यानंतर मी सुरूवातीला ५ हजार रुपये गुंतवून हा गेम खेळायला सुरूवात केली. काही वेळातच त्या ५ हजारांचे ५० हजार झाले.त्यामुळे मला हाव सुटली. ही हाव एवढी मोठी झाली की, ती मला ८० लाखांच्या कर्जापर्यंत घेऊन गेली. खेळण्यासाठी मी स्वत:ची जमीन, गाडी गहाण ठेवली. इतरांकडून कर्ज घेतलं. या गेमच्या नादापायी माझं खाण्या-पिण्यावरदेखील लक्ष नव्हतं. मोठ्या प्रमाणात आर्थिक, मानसिक, शारीरिक आणि सामाजिक नुकसान झाल्याचे जाधव यांनी म्हटलं आहे.आपला अनुभव कथन करत कोणीही अशा ऑनलाईन गेम्सकडे वळू नये असे जाधव सांगतात.*

*कृषीमंत्र्यांच्या व्हिडीओनंतर पुन्हा एकदा हे ऑनलाईन रमीचे आणि बेटिंग गेमची चर्चा राज्यात सुरू झाली आहे. असे असले तरी गेल्या बर्याच वर्षांपासून बर्याच जणांनी या गेम्सच्या आहारी जाऊन आपले आयुष्य बरबाद केले आहे. अशीच एक घटना धाराशिव जिल्ह्यातील आहे. ऑनलाईन रमी खेळाच्या नादापायी लक्ष्मण जाधव या तरूणाने स्वत:सह आपल्या पत्नी आणि मुलाला संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. अशी अनेक उदाहरणे असतील जी समोर आलीही नसतील. काहींनी हजार काहींनी लाखो तर काहींनी कोट्यवधी रूपये यात गुंतवून ते स्वत: आता कर्जाच्या ओझ्याखाली दबले गेले आहेत. आतापर्यंत किती जणांनी असे ऑनलाईन रमी गेम्स खेळून संपत्ती जमवली, याची नेमकी माहिती नाही. परंतु, अधिकाअधिक जणांचे आयुष्य यात पोळलं गेलं आहे, हे नक्कीच.*

*गेल्या बर्याच वर्षांपासून ऑफलाईन रमी गेम्स खेळताना अनेक जण बरबाद झाले आहेत, याची अनेक उदाहरणं समाजात असतील. त्यात आता ऑनलाईन रमी गेम्सची जोड मिळाली आहे. परंतु,तरी देखील असे गेम्स खेळण्याकडे अनेकांचा कल का आहे? आणि अशा गेम्समध्ये अगदी आर्थिकदृष्ट्या बरबाद होईपर्यंत अजूनही बरेच जण चुंबकासारखे ओढले जात आहेत? ही खरोखरच संशोधनाची बाब आहे.*

*ही ऑनलाईन गेमिंग ॲप्स नेमकी कशी काम करतात? खेळणारे पैसे कसे गमवतात? पैसे गमावले तरी त्या गेम्समध्येच कसे अडकून पडतात? हे समजून घेणं महत्वाचं आहे. हे असे ॲप्स असतात, जे तुम्हाला फक्त एका क्लिकवर तुम्ही घरबसल्या पैसे कमवू शकता याचा विश्वास देतात. हे गेम्स अगदी सोप्या पद्धतीने खेळणार्यासमोर मांडले जातात, की कोणालाही वाटतं, की आपणही हे गेम्स खेळू शकतो. आणि हेच या खेळातील जाळे आहे. हे ॲप्स तुम्हाला अशा पद्धतीने फसवतात, की तुम्हाला पैसे कमवण्यासाठी ही एक सुवर्णसंधी आहे, असं वाटतं. तुम्ही सुरूवातीला अगदी छोटी छोटी रक्कम जिंकता, तेव्हा तुम्हाला वाटतं की, पैसे कमवण्याची ही किती सोपी पद्धत आहे. परंतु, हाच खरा सापळा असतो. हे ॲप्स मनुष्याच्या मानसिकतेचा विचार करून बनवले जातात. त्यामुळे ॲपच्या योजनेप्रमाणे हे गेम्स खेळणारा, हळूहळू या ॲपमध्ये एवढा गुंतून जातो की, त्याला त्याचे व्यसन लागतं.*

*एखादा माणूस या या गेमिंग ॲप्सच्या जाळ्यात कसा फसतो, हे पाहणे महत्वाचे आहे. जेव्हा माणूस उदास असेल, त्याला पैशांची गरज असेल,तेव्हा माणूस जास्तीत भावनिक निर्णय घेतो. या भावनिक स्थितीचा हे ऑनलाईन गेमिंग ॲप्स फायदा उचलतात. त्यानंतर जाहिरातींद्वारे प्रचार करून ॲप्समध्ये गेम्स खेळण्यासाठी प्रवृत्त केले जाते. एकदा का गेम्स खेळण्यास सुरूवात झाली की, खेळणारा व्यक्ती यात इतका गुंततो, की आपण गमावलेली रक्कम आपल्याला कशी पुन्हा मिळवता येईल याचा तो विचार करतो आणि या जाळ्यात गुंतून राहतो. त्याला त्याचे गमावलेले पैसे परत मिळण्याची शक्यता अगदीच अल्प असते आणि पैसे आलेच परत तर तो पुन्हा त्या ॲपमध्ये गुंतवण्याचा ट्रॅप असतो. या गेम्सची गंमतही अशी की ती सतत तुम्हाला खेळण्यासाठी प्रवृत्त करत असतात. जेवढे तुम्ही खेळाल तेवढे त्या गेमनिर्मात्यांच्या फायद्याचे असते. म्हणून वेगवेगळ्या क्लुप्त्या लढवून गेमिंगसाठी आकृष्ट केले जाते. यातूनच ऑनलाइन जुगाराची सवय नकळत जडते.*

*ऑनलाइन गेमिंग उद्योग गेल्या काही वर्षांत काही हजार कोटींच्या घरात गेला आहे. परंतु, याचा परिणाम असा झाला आहे की, इंडियन जर्नल ऑफ कम्युनिटी मेडिसिन ॲंड हेल्थ २०२० नुसार ३.५ टक्के जुगारी इंटरनेट गेमिंग डिसॉर्डरने पीडित आहेत. मद्यसेवनापेक्षाही अधिक घातक नशा या ऑनलाईन गेम्सची आहे. याआधी ऑफलाईन रमी गेम्स ज्याला समाजात जुगार म्हटले जाते, त्या जुगारापायी अनेक कुटुंबे उद्धवस्त झाली आहेत. परंतु, दारूप्रमाणेच दिवसेंदिवस वाढत जाणार्या या नशेचा उतारा कोणत्याही यंत्रणेला आतापर्यंत सापडलेला नाही. किंवा ही नशा उतरवण्याचे औषध उपलब्ध नाही. एकंदरित आपल्या यंत्रणांच्या दृष्टीने असे ऑनलाईन रमी गेम्स हे गेम ऑफ स्किल्स म्हणजे कौशल्यावर आधरित खेळ आहेत. त्यामुळे अशा ऑनलाईन गेम्सवर आतापर्यंत मोठ्या प्रमाणात कारवाई झालेली नाही. ना त्यांच्यावर बंदी घालण्याचा विचार केला गेला. आगामी काळात अशा गेम्सना आळा बसेल याची शक्यता आता तरी नाही.*

*जोपर्यंत झटपट पैसे कमवण्याची नको ती इच्छा आणि पैशांची हाव आहे, तोपर्यंत अशा ॲप्सचा बाजार हा मोठ्या प्रमाणात वाढतच जाणार आहे. कहर हा आहे की, या ऑनलाईन जुगाराबाबत जनजागृती करणारे जे व्हिडीओ समाजमाध्यमांवर उपलब्ध आहेत, त्या व्हिडिओंच्या आधीदेखील या रमी ॲप्सच्या जाहिराती दिसतात. त्यामुळे या ऑनलाईन रमी ॲप्सची मजल कुठपर्यंत आहे हे समजेल. त्यामुळे आजूबाजूची परिस्थिती आणि माणसांचे अनुभव पाहून तरी, सामान्य नागरिकांनी अशा ॲप्सपासून शक्य तो दूर राहण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. कोणत्याही माणसाची प्रगती झटपट होत नाही, अगदी देशातील अग्रगण्य कंपन्यांचा वार्षिक नफादेखील दरवर्षी दुप्पट होत नाही, त्यामुळे कोणत्या तरी रमी ॲप्सवरून आपण काही वेळातच हजारो रूपयांचे कोट्यवधी करू अशी भाबडी आशा सोडून देणे गरजेचं आहे. असं होणं अशक्य असतं. उलट या ऑनलाईन रमी ॲप्समध्ये गुंतून आहे ते स्थैर्य गमावून बसण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे यापुढे तरी अशा ॲप्सच्या मोहात न पडता ते मोबाईलवर दिसल्यास स्कीप करण्याची सवय लावल्यास पुढील धोका टळेल.*

# श्रावण सोमवारचे आध्यात्मिक महात्म्य!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती-** श्रावण महिन्यात प्रत्येक दिवसाचे महत्त्व अतिशय वेगवेगळे आहे. प्रत्येक दिवशी विविध व्रत सांगितली आहे. मात्र त्यातील सर्वात महत्त्वाचे व्रत म्हणजे श्रावण सोमवार. श्रावण हा शिवपूजनासाठी अतिशय महत्त्वाचा पवित्र आणि शुभ मानला जातो. श्रावणी सोमवारी शिवपूजनानंतर 'शिवामूठ' वाहण्याची परंपरा भारतीय संस्कृतीत आहे. 'शिवामूठ' श्रावणातला मोठा वसा मानला जातो. यावर्षी श्रावण मासात एकूण चार सोमवार आले आहेत. २८ जुलैपासून गावागावातील शिवमंदिरात, देवघरात महिलावर्ग 'शिवामूठ' व्रताचा आरंभ करणार आहेत.



श्रावण हा महादेवांचे पूजन नामस्मरण उपासना करण्यासाठी सर्वोत्तम मानला गेल्यामुळे श्रावणातील प्रत्येक सोमवारला विशेष महत्त्व प्राप्त होते. यंदाच्या वर्षी २८ जुलै ४ ऑगस्ट ११ ऑगस्ट व १८ ऑगस्ट रोजी श्रावणी सोमवार आहे. सोमवारी शिवमंदिरात अभिषेक एकादशणी लघुरुद्र महारुद्र श्री वरद शंकर पूजा असे विविध धार्मिक कार्यक्रम वैयक्तिक अथवा सार्वजनिक स्वरूपात केले जातात.

दर सोमवारी नवविवाहिता उपवास करून शिवाला शिवामूठ वाहतात. हे व्रत विवाहानंतर पाच वर्ष किंवा सोळा वर्षापर्यंत केले जाते. श्रावण महिन्यात दर सोमवारी धान्याची एक शिवामूठ शिवमंदिरात जाऊन महादेवास अर्पण करावयाची असते. यामध्ये पहिल्या सोमवारी तांदूळ दुसर्या सोमवारी तिळ, तिसर्या सोमवारी मूग चौथ्या सोमवारी जवस व पाचव्या सोमवारी सातू शिवपिंडीवर वाहिले जातात. नवविवाहिता वधू-वरांचे आचार विचारांचे मतैक्य व्हावे व त्यातून संसारसुख लाभावे या उद्देशाने हे शिवव्रत आचरले जाते.

### शिवामूठ दान का करतात..?

काहीही दान केल्याने कमी होत नाही तर त्यात वाढ होते, मग ते ज्ञान असो वा अन्न, हीच आपल्या भारतीय संस्कृतीची शिकवण आहे. मूठभर असले तरीही ते देता आले, याचे गृहिणींना समाधान मिळते मूठ-मूठ करून काही अन्नधान्य मिळाले, याचे घेणार्याला समाधान, असा दुहेरी लाभ या व्रतवैकल्यांमधून होताना दिसतो.

### 'शिवामूठ' वाहण्यासाठी अशी आहेत धान्ये

२८ जुलै रोजी तांदूळ, ४ ऑगस्ट रोजी तीळ, ११ ऑगस्ट रोजी मूग व १८ ऑगस्ट रोजी जवस या क्रमाने नवविवाहिता महादेवाची पूजा करून 'शिवा शिवा महादेवा... माझी शिवामूठ ईश्वरा देवा...' असे म्हणत शिवपिंडीवर 'शिवामूठ' वाहणार आहेत.

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय SWYM -NPTEL मध्ये सर्वोत्तम

## महाविद्यालयास ॲंक्टिव लोकल चॅप्टर - प्रॉस्पेक्ट कॅटेगीरीत मिळाला पुरस्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲंड मॅनेजमेंट महाविद्यालयाने आयआयटी द्वारा स्वयम - एनपीटीईएल यांच्या वतीने दिला जाणारा एक मानाचाॲंक्टिव लोकल चॅप्टर - प्रॉस्पेक्ट (जानेवारी - एप्रिल २०२५) abtive Lobal Chater - PROSPECT (Jan- 2025) हा पुरस्कार पटकावला आहे. महाविद्यालयासाठी ही अत्यंत गौरवास्पद बाब असून, महाविद्यालयाच्या स्वयम - एनपीटीईएल (SWYM - NPTEL) समन्वयक प्रा. रचना माहुले व त्यांच्या टीम मेंबर यांनी महाविद्यालयाचे संचालक, प्राचार्य , उपप्राचार्य यांच्या मार्गदर्शनात केलेल्या अथक परिश्रमाने हा पुरस्कार मिळवणारे पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग ॲंड मॅनेजमेंट हे अमरावती विभागातील पहिले महाविद्यालय ठरले आहे.




हा पुरस्कार सोहळा आयआयटी बॉम्बे येथे नुकताच संपन्न झाला.NPTEL (National Programme on Tebhnology Enhanbed Learning) आणि SWYM हे भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत चालणारे ऑनलाईन शिक्षण मंच आहेत. यामार्फत देशातील विद्यार्थ्यांना खखढ आणि IISb सारख्या नामांकित संस्थांच्या दर्जेदार अभ्यासक्रमांचा लाभ घेता येतो. विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता व प्लेसमेंट करिता या NPTEL सर्टिफिकेटचा फायदा होतो.या पुरस्काराद्वारे पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲंड मॅनेजमेंट महाविद्यालयाची सक्रिय सहभागिता, नियमित मार्गदर्शन, विद्यार्थ्यांचा प्रतिसाद आणि शैक्षणिक उत्कृष्टता याची दखल घेण्यात आली आहे. abtive Lobal Ch[ater - PROSPECT या श्रेणीत निवड होणे म्हणजे महाविद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीला मिळालेला सन्मान आहे.संचालक डॉ पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया यांनी या यशाबद्दल समाधान व्यक्त करत सांगितले की, हा पुरस्कार संपूर्ण महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब असून, भविष्यात अधिकाधिक विद्यार्थी आणि शिक्षक SWYM - NPTEL च्या माध्यमातून तंत्रज्ञानाधारित शिक्षणाचा लाभ घेतील.या यशासाठी महाविद्यालय SWYM - NPTELसमन्वयक प्रा. रचना माहुले व त्याची संपूर्ण प्राध्यापकांची टीम, महाविद्यालयाचे प्राध्यापक वर्ग, आणि विद्यार्थ्यांचे विशेष योगदान राहिले असून हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, प्राचार्य , उपप्राचार्य , प्राध्यापक यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे.

# आजपासून विद्यापीठात पाच दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ अमरावती** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील गृहविज्ञान विभाग व मालवीय मिशन टीचर्स ट्रेनिग सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २८ जुलै ते ०१ ऑगस्ट दरम्यान पीएम. उषा या योजनेअंतर्गत पाच दिवसीय 'इथिक्स रिसर्च ॲन्ड आय.पी.आर.' या विषयावर शिक्षक तसेच पदव्युत्तर विद्यार्थी, संशोधन करणा-या विद्यार्थ्यांकरिता राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेचे उद्घाटन २८ जुलै रोजी सकाळी ११.३० वा. कुलगुरू डॉ. मिलींदबारहाते यांच्या हस्ते होणार असून, विद्यापीठ व्य.प. सदस्य डॉ. रवींद्र कडू प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यशाळेमध्ये सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस, पुणे येथील सिम्बायसिस सेंटर फॉर रिसर्च ॲन्ड इनोलेशनच्या माजी संचालक डॉ. रुचिका कौल घाणेकर, सी.पी. ॲन्ड बेरार कॉलेज, नागपूर येथील डॉ. आशीष लिगे, श्री शिवाजीमहाविद्यालय, अमरावती येथील ग्रंथपाल डॉ. रेवती खोकले, गव्हर्नमेंट इन्स्टिटपुट ऑफ फॉरेन्सिक सायन्सेस नागपूरचे डॉ. हरिप्रसाद पाईकराव ही तज्ज्ञ मंडळी विविध विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेचा समारोपीय कार्यक्रम १ ऑगस्ट रोजी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या अध्यक्षतेकाली तथा व्य.प. सदस्य डॉ. मनीषा कोडापे, डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.







## उपवासामुळे होणारी सिडिटी टाळायची आहे? मग 'हे' सोपे उपाय नक्की करा

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**

श्रावण महिना हा व्रत-वैकल्यांचा महिना म्हणून ओळखला जातो. या काळात अनेक धार्मिक परंपरा श्रद्धेने पाळल्या जातात. या महिन्यात अनेक मराठी सणांच्या दिवशी श्रद्धेने उपवास केला जातो. मात्र, अनेक तास पोट रिकामे राहिल्यामुळे पोटात आम्ल (सिड) तयार होते आणि जळजळ, आंबट ढेकर आणि छातीत दुखण्याचा त्रास सुरू होतो. यालाच आपण 'सिडिटी' म्हणतो. पण काही सोप्या उपायांनी तुम्ही उपवासाचा आनंद घेऊ शकता आणि सिडिटीच्या त्रासापासून पूर्णपणे दूर राहू शकता.



उपवासाच्या दिवशी काय आणि कसे खावे, हे सर्वात महत्त्वाचे आहे. योग्य आहार घेतल्यास सिडिटीचा त्रास जवळपास पूर्णपणे टाळता येतो.

रिकाम्या पोटी सुरुवात नको: उपवासाची सुरुवात करण्यापूर्वी केळे, सफरचंद, मूठभर बदाम किंवा थोडे दही खा. यामुळे पोटात थेट सिड तयार होण्यास प्रतिबंध होतो.

थोड्या-थोड्या वेळाने खा: एकाच वेळी भरपूर खाण्याऐवजी दर दोन-तीन तासांनी थोडे-थोडे खात रहा. यामुळे पोटाला आराम मिळतो आणि सिड नियंत्रणात राहते.

हे पदार्थ खा: उकडलेले रताळे, साबुदाणा खिचडी (कमी तेलाची), फळे (केळी, सफरचंद, पपई), खजूर आणि राजगिरा लाडू हे उत्तम पर्याय आहेत.

**हे पदार्थ टाळा:** संत्री, मोसंबी यांसारखी आंबट फळे, तळलेले पदार्थ (साबुदाणा वडा, तळलेली बटाट्याची भाजी) आणि मसालेदार पदार्थ खाणे टाळा.

सिडिटी टाळण्यासाठी शरीराला योग्य प्रमाणात पाणी मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

**भरपूर पाणी प्या:** दिवसभरात थोडे-थोडे पाणी पित रहा. यामुळे पोटातील सिड पातळ होण्यास मदत होते.चहा-कॉफीला रामराम: उपवासात चहा किंवा कॉफी पिण्याची चूक करू नका. कॅफीनमुळे सिडिटीचा त्रास प्रचंड वाढतो.

उत्तम पर्याय: थंड दूध, ताक, लिंबू-साखरेचे सरबत (सिडिटीचा त्रास नसल्यास) किंवा शहाळ्याचे पाणी प्या. हे नैसर्गिकरित्या सिडिटी शांत करतात.

# गुणवत्तापूर्ण व अधिक उत्पादनासाठी ह्या पद्धतीने करा आंब्याची लागवड

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक-** भारताव्यतिरिक्त मेक्सिको, ब्राझिल, चीन, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, इस्त्राईल अशा अनेक देशांमध्ये आंबा उत्पादन होते. एकूण लागवड क्षेत्रामध्ये भारत आघाडीवर असला तरी भारताची हेक्टरी उत्पादकता ही अत्यंत कमी आहे.




भारतात (हे. ८ टन), तुलनेत दक्षिण आफ्रिका (हे. ४० टन), इस्त्राईल (हे. ३५ टन) असून उत्पादनाच्या बाबतीत आघाडीवर आहेत. त्यातही महाराष्ट्राची उत्पादकता सव्वा चार टन इतकीच आहे.

उत्पादकतेमध्ये मागे असण्यामागे आजही कोणत्याही नवीन तंत्रज्ञानाच्या वापराविना पारंपरिक पद्धतीनेच लागवड केली जाते हे प्रमुख कारण दिसत आहे.




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बॅंकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

अतिघन लागवडीचे फायदे

उपलब्ध जमीन आणि संसाधने यांचा उत्तम वापर.

आंबा बाग आंतर मशागतीस अतिशय सोयीस्कर.

बागेत फळधारणा लवकर येवून, नियोजन करता येते.

सूर्यप्रकाशाचा जास्तीत जास्त जास्त आढळतो, त्यामुळे खालच्या फांद्यातील पानांमध्ये प्रकाश संश्लेषण जास्त चांगले होण्यास मदत होते.

गुणवत्तापूर्ण उत्तम प्रतिची फळे आणि एकरी जास्त उत्पन्न घेणे शक्य आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा सहज वापर करता येतो.

कार्बन डायऑक्साइड जड असल्यामुळे वातावरणात खालच्या थरात उपयोग करता येतो.

### भारतातील हेक्टरी झाडांची संख्या व अंतर (मीटर)

| अंतर | | हेक्टरी झाडांची संख्या |
|---|---|---|
| १३ | १३ | ५९ |
| १० | १० | १०० |
| ५ | ५ | ४०० |
| ६ | २ | ८३३ |
| ६ | ३ | ५५५ |
| ५ | ४ | ५०० |
| ५ | ३ | ६६६ |
| १. | ५४ | १,६६६ |
| १. | ५३ | २,२२२ |

लवकर आर्थिक उत्पादन मिळते व फवारणी, खते देणे, आंतरमशागत तसेच फळांची अंतर्गत वाहतूक इत्यादी कामे ट्रॅक्टरने सहज करता येतात.

फळांची काढणी सहज करता येते.

निर्यात योग्य फळांची गुणवत्ता मिळवण्यासाठी फळांची विरळणी करणे अतिशय सोपे होते.

फळांना पिशव्या लावणे देखील सोपे जाते.

प्रति हेक्टरी उत्पन्नात वाढ होवून आर्थिक विकास वाढू शकतो.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २८ जुलै २०२५ शहर/ग्रामिण


## '... तुजविन शंभो मज कोण तारी'

# पहिल्याच श्रावण सोमवारी शिवालये गजबजली

### पहाटेपासून दर्शनासाठी शिवभक्तांच्या रांगा

### मंदिरांमध्ये शिवपिंडीला साजश्रृंगार

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

आज श्रावण महिन्याच्या पहिल्याच सोमवारी अमरावती शहरासह जिल्हाभरातील शिवालये शिवभक्तांच्या गर्दीने फुलून गेली होती. पहाटे ४ वाजतापासूनच भाविकांनी शिव मंदिरांमध्ये दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. शहर व ग्रामीण भागात अनेक ठिकाणी भगवान शिवाच्या जयघोषात कावड यात्र काढून नदीचे पाणी आणले गेले. त्याने शिवपिंडीला अभिषेक करण्यात आला. मंदिरांमध्ये शिवपिंडीला विलोभनीय साजश्रृंगार करण्यात आला होता. शिवमंदिरांच्या परिसरातील वातावरणात आज भक्तीचा अलौकिक संचार झाल्याची अनूभूती भक्तांना घेता आली. अमरावती शहर परिसरातील कोंडेश्वर, गडगडेश्वर, तपोवनेश्वर, पाताळेश्वर, संगमेश्वर, गुप्तेश्वर या शिवभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या पूरातन मंदिरांसोबतच अन्य लहान मोठी मंदिरे शिवभक्तांच्या गर्दीने गजबजली होती. ग्रामीण भागात नांदगांव खंडेश्वरचे खंडेश्वर शिवालय, सालबर्डीचे छोटा महादेव देवस्थान, वाठोडा येथील शूक्लेश्वर देवस्थान, चांदूर रेल्वे -मांजरखेड तसेच देउरवाडा येथील प्रसिद्ध शिवालयांमध्ये भगवान शंकराच्या भक्तांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून मनोभावे पूजा-आर्चा व प्रार्थना केली. शिवपिंडीला बेलपत्र, धतूरा आदि शिवाला प्रिय असलेल्या वस्तू अर्पण केल्या गेल्या. मंदिरांमधील नंदी, त्रिशूळ व संपूर्ण परिसराची सजावट करण्यात आली होती.भगवान शिवाची स्तुती करणारी भजने आणि मंगल वाद्यांच्या स्वरांनी शिवालयांचा परिसर प्रफुल्लित झाला होता. महाआरती, भजन, किर्तन अशा धार्मिक कार्यक्रमांमध्ये शिवभक्तांनी सहभाग घेतला. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी कावड यात्रेद्वारे नदीचे पाणी आणून शिवभक्तांनी मनोभावे शिव पिंडीचा अभिषेक केला. अमरावती शहरात प्रताप चौकातील संक्रेश्वर महादेव मंदिरात तरुणांनी शिवाचा विलोभनिय श्रृंगार केला होता. गडगडेश्वरच्या प्रसिद्ध शिव मंदिरात भक्तांच्या दोन-तीन गटाने भक्तीभावाने भगवान शंकराचा जल व दुधाने अभिषेक केला. येथे रुद्राभिषेकाचा विधीही पार पडला. चांदुर रेल्वे मार्गावरील बेडोना स्थित तपोवनेश्वर शिवलिंगाचीही भक्तांकडून पूजा व आराधना करण्यात आली.



शहरातील भाजी बाजार येथील सोमेश्वर महादेव मंदिर, भूतेश्वर चौकातील पूरातन शिवमंदिर, चांदुर रेल्वे मार्गावरील पाताळेश्वर गुप्तेश्वर, मोर्शी मार्गावर नांदगाव पेठनजीक असलेले संगमेश्वर शिवालय यासह अन्य लहान-मोठ्या सर्वच शिव मंदिरात आज भगवान शिवाच्या आराधनेसाठी मोठ्या संख्येने शिवभक्त पोहोचले. अभिषेक, पोथी वाचन, किर्तन, भजन, पूजा-आर्चा असे धार्मिक विधी पार पडले. पहिल्या श्रावण सोमवार निमित्त शिव मंदिरांची आकर्षक पद्धतीने सजावट करण्यात आली होती. रात्री मंदिरावरील रोषणाईने परिसर उजळून गेले होते. काही मंदिरांमध्ये भक्तांसाठी फराळाची व्यवस्थाही करण्यात आली होती.

# 'महा स्माईल्स' मोहिमेमुळे विदर्भातील चेहऱ्यांवर पुन्हा फुलणार हसू...!

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील पुढाकाराने शक्य

**विदर्भ प्रजासत्ताक**



**दि.२८मुंबई,-** बालकांच्या चेहऱ्यावरील दुभंगलेले ओठ (क्लेफ्ट) व फाटलेले टाळू (पॅलेट) या जन्मजात विकारावर उपचार आणि जनजागृती करून या बालकांच्या निरागस चेहरधावर हसू फुलविणे, हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ध्येय आहे. यासाठी त्यांनी विदर्भातील अशा बालकांवर उपचार आणि जनजागृतीची गरज ओळखत त्यांनी स्वयंसेवी संस्थांना, आवाहन केले.मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आवाहनाला 'स्माईलट्रेन इंडिया' ही स्वयंसेवी संस्था आणि बजाज फिनसर्वच्या शेफाली बजाज यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचे हे स्वप्न आता मिशनमोडवर साकार होतांना दिसत आहे.स्माईल ट्रेन इंडिया' ही आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था आणि बजाज फिनसर्व यांच्या सामाजिक उत्तरदायित्वातून आता ही मोहीम पूर्णपणे मोफत राबविली नाणार आहे. महा स्माईल्स क्लेफ्ट जनजागृती आणि उपचार मोहीम' ही केवळ वैद्यकीय मोहीम नसून, हजारो बालकांना नवजीवन देणारी एक आशावादी चळवळठरणार आहे. या आगळ्यावेगळ्या मोहिमेचा नागपूर येथे ३१ जुलै २०२५ रोजी सकाळी११ ते दुपारी १२.३० या वेळेतस्वामी विवेकांनद मेडिकल मिशन हॉस्पिटल, खापरी, येथून शुभारंभहोणार आहे.या पहिल्यावहिल्या उपक्रमाअंतर्गत पुढील ९० दिवसांत तीन विशेष मोबाईल व्हॅन विदर्भातील संपूर्ण ११ जिल्ह्यात फिरून लोकांमध्ये क्लेफ्ट विकाराविषयी माहिती देणार आहेत. यामध्ये लवकर निदान, उपचाराची शिफारस आणि गरजू बालकांसाठी मोफत शखक्रियांची नोंदणी असे विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. या बालकांवर नागपूर, गोंदिया, अकोला, वर्धा येथील रूग्णालयात शखक्रिया केल्या जाणार आहेत. क्लेफ्ट विकार हा जन्मजात असून यात ओठ आणि टाळू हे दुभंगलेले असतात. जवळपास ७०० मुलापैकी एका मुलांमध्ये हा विकार दिसून येतो. यावरशखक्रियाकरूनचाद्याविकास दूर करता येते. वेळीच उपचार केले नाहीत तर कान बधिर होणे, बोलण्यात अडथळा येणे अशा वेगवेगळ्या व्यंगासीचत सामाजिक एकटेपणा येऊ शकतो, तथापि या विकारावर उपचार असून ६-७ शस्त्रक्रियेनंतर यावर पूर्णपणे मात करता येते. या सर्व शखक्रिया खर्चिक असल्याने आर्थिक दुर्बल कुटुंबातील व्यक्तींना ते परवडणारे नाही. म्हणूनच संवेदशील नेतृत्व असलेल्या मुख्यमंत्यांनी क्लेफ्ट वरील उपचार संपूर्ण मोफत व्हावे, यासाठी याविशेष मोहिमेचे आयोजन केले आहे.

# वडाळीत नागपंचमी उत्सव प्रारंभ

### उद्याला पालखी सोहळा, बुधवारी महाप्रसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

वडाळी येथील इंद्रशेष दरबार, संस्थानच्या वतीने नागपंचमी महोत्सवाला घटस्थापनेने प्रारंभआला. मंगळवारी (ता. २९) नागपंचमीनिमित्त दिंडी पालखी सोहळ्याचे आयोजित करण्यात आले आहे.शुक्रवारी (ता. २५) घटस्थापनेने नागपंचमी



महोत्सवाला सुरवात झाली. त्या अनुषंगाने पाचही दिवस दुपारी दोन वाजतापासून कैलास महाराज यांचे नियमित शिवमहापुराण कथा पारायण, सायंकाळी पाच वाजता हरिपाठ व महाआरती, असे धार्मिक कार्यक्रम मंदिरात सुरू राहणार आहेत. मंगळवारी (ता. २९) नागपंचमीनिमित्त सकाळी ११ वाजता दिंडी पालखी सोहळ्याला सुरवात होईल. त्यानंतर इंद्रशेष भजन मंडळ काजळसरा येथील दीपक पाटील व त्यांचा संच दुपारी दोन वाजता भजने सादर करतील. त्यापाठोपाठ वर्धा येथील नरेश खंडाळकर, दामोधर राऊत यांच्या संचाचे सादरीकरण होईल. शिवाय रात्री वारकरी हरिपाठ व महाआरती होईल. बुधवार ३० जुलैला महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. दिव्यांग गोरगरिबांना वखदानही केल्या जाईल. बुधवार ३० जुलैला रात्री आठ व नऊ वाजता 'स्वर भक्तीचे' हा स्वरा ईश्वरकर, राहुल तायडे व राजकुमार निंबोकार यांच्या भजनाचे सादरीकरण होईल. नागरिकांनी नागपंचमी उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# एक लाख ग्राहकांकडे ४५० कोटींचे पाणीपट्टी कर थकीत

### ४ ऑगस्टपासून अवैध नळकनेक्शन धारकांवर होणार धडक कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

अमरावती-बडनेरा शहरातील १लाखांपेक्षा अधिक ग्राहकांना पाणीपुरवठा करणारी योजना सलग चौथ्यावर्षीही ४ कोटींने तोट्यात आहे. १ लाख ग्राहकांकडे ४५० कोटी पाण्याचे देयके थकीत असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या वतीने दिवाळीनंतर होणारी कारवाई बाप्पांच्या आगमनापूर्वीच सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. ४ ऑगस्टपासून पाणीचोरी करणाऱ्यांविरुध्द कारवाईचा बडगा उगारला जाणार असल्याची माहिती जीवन



प्राधिकरणचे उपअभियंता संजय लेव्हरकर यांनी दिली.संपूर्ण शहराला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या माध्यमातून अप्पर वर्धा धरणातून पाणीपुरवठा करण्यात येतो. मजीप्रा १ लाख ०५ हजार ग्राहकांच्या घरापर्यंत पेयजलापूर्ती करते. सर्वाधिक ग्राहक संख्या अमरावती महापालिका हद्दीत आहे. अनेक वर्षापासून महापालिकेच्या वतीने सार्वजनिक नळांच्या माध्यमातून पाण्याचा वापर करण्यात आला. मात्र १८६ कोटीचे देयके थकीत आहे. तर उर्वरित रक्कम ही सरकारी कार्यालय, शासकीयसंस्था व घरगुती ग्राहकांकडे आहे. दरवर्षी मजीप्रा ३-४ कोटींनी तोट्यात असते. आतापर्यंत ही योजना ९ कोटींनी तोट्यात होती. सन २०२४-२५ मध्ये या योजनेत ४ कोटींची आणखी भर पडल्याने योजना १२ कोटींने तोट्यात आली आहे. दरमहिन्याला ग्राहकांना पाणीपुरवठा करण्यासाठी ३ कोटी रुपये खर्च केला जातो. यातुलनेत मात्र वसूली मात्र २ कोटींची होत असल्याने योजना तोट्यात आहे. सन २०२४-२५ मध्ये ३६ कोटी वसूली अपेक्षित असताना फक्त ३२ कोटी वसुली झाली. गतवर्षीसुध्दा ४ कोटींनी योजना तोट्यातच होती.

> **थकीत देयके भरुन सहकार्य करा**
>
> 
>
> अवैध नळ कनेक्शन बंद करण्याची कारवाई केली तर नक्कीच सर्वांना पाणीपुरवठा होईल. यामध्ये सुधारणा करण्याचे काम केले जात आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची आर्थिक स्थिती खालावली आहे. दरवर्षी योजना तोट्यात जात असल्याने थकीत देयके भरुन सहकार्य करणेच मजीप्राला अपेक्षित आहे. **संजय लेव्हरकर, उपअभियंता, मजीप्रा.**

# जिल्ह्यात तिसऱ्या दिवशीही पावसाची रिपरिप

### मोठा व मध्यम सिंचन प्रकल्प मात्र ४८ टक्क्यांवरच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती,**



जिल्ह्यात बहुतांश भागात सलग तिसऱ्या दिवशी रविवारला सुद्धा पावसाची रिपरिप सुरू होती. संथगतीने पडणाऱ्या या पावसाचा सर्वाधित लाभ पिकांना होत असून जिल्ह्यातील मोठेव मध्यमसिचन प्रकल्प मात्र ४८ टक्केवरच भरले आहे. मागील वर्षी या महिन्यांत सिचन प्रकल्पांचा जलसाठा ५० टक्क्यांच्यावर होता.जिल्ह्यात १० दिवसांपासून पावसाने दडी दिल्यानंतर मागील आठवड्यात पावसाने पुनरागमन केले. शुक्रवारपासून जिल्ह्यात संत गतीने हा होईना परंतु संततधार पाऊस सुरू आहे. तीन ते चार महसूल मंडळ वगळता अन्य महसूल मंडळांत २५ ते ५० मिमीच्या मध्येच पावसाची नोंद झाली आहे. या पावसामुळे खरिपाच्या पिकांना संजीवनी मिळाली आहे. काही भागात झालेल्या पावसामुळेनदीवमोठ्या नाल्यांची जलपातळी वाढली आहे. परंतु जिल्ह्यातील सर्वात मोठ्या अप्पर वर्धा धरणाचा जलसाठा मात्र ४५ टक्क्यांवरच आहे. मागील वर्षी अप्पर वर्धा धरण६३ टक्क्यांवर भरले होते तर इतर सिचन प्रकल्पांत ५२ टक्क्यांवर जलसाठा होता. मात्र जुलै महिना संपत असताना यंदा ५० टक्क्यांची पातळी देखील सिचन प्रकल्पांनी ओलांडली नाही. यामधील बहुतांश सिचन प्रकल्पांचा उगम हा मध्य प्रदेशातून आहे. या राज्यात दमदार पाऊस नसल्याने या प्रकल्पांमध्ये जलसाठ्यात विशेष वाढ झाली नसल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात रविवारी देखील पावसाची रिपरिप सुरू होती. २४ तासांत १८.७ मिमी पावसाची नोंद घेण्यात आली आहे.


# रक्षाबंधनानिमित्त बाजारपेठ सजली

### विक्रेते म्हणतात महागाईमुळे दरवाढ झाली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती -**

काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या रक्षाबंधनानिमित्त शहरातील बाजारपेठेत आकर्षक राख्या विक्रीस दाखल झाल्या आहेत. महिलांना या राख्या भुरळ घालत आहे. बहीण- भावाच्या पवित्र नात्याचे प्रतीक असलेला सण रक्षाबंधन शनिवार, ९ ऑगस्टला साजरा होणार आहे. महागाईमुळे दरांमध्ये सुमारे २० टक्क्यांनी वाढ झाल्याचेही व्यावसायिकांनी सांगितले.

बाजारपेठेत विविध प्रकारच्या आकर्षक राख्यासह पारंपारिक गोंडा राखी (देव राखी) बाजारात विक्रीस दाखल झाली आहे. महिलांकडून राख्यांच्या दुकानात खरेदीसाठी गर्दी केली जात आहे. शहराच्या विविध भागांमध्ये लहान- मोठ्या राखी विक्रीचे दुकाने सजल्याचे दिसत आहे. परदेश तसेच शहराबाहेर कामानिमित्त असलेल्या भाऊरावांना वेळेत राखी पोहोचण्यासाठी आतापासूनच राखी खरेदी करण्याकडे महिलांचा कल वाढला आहे. चांगल्यात चांगली आणि आकर्षक राखी खरेदीस महिलांकडून पसंती दिली जात आहे. दुसरीकडे व्यावसायिकांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे. आतापासूनच किरकोळ विक्रेते आणि सामान्य नागरिकांकडून खरेदीसाठी गर्दी केली जात आहे. सुमारे ५० टक्क्याने ग्राहक वाढले असल्याची माहिती व्यावसायिकांकडून देण्यात आली. कुंदन वर्क आणि साध्या राख्यांना जास्त मागणी आहे.



चिमुकल्यांसाठी लायटिंग राख्या: छोटा भीम, डोरेमॉन, मोटू पतलू, श्री गणेशा, श्रीकृष्ण अशा राख्या बाजारात विक्रीस आल्या आहे. लायटिंग, लाकडी, पपेट, कडा राखीसह पारंपरिक देव राखी अशा विविध प्रकारच्या राख्या बाजारात विक्रीस आले आहे. असे आहेत राख्यांचे प्रकार अन् दर (रुपयांत) साधी आणि स्पिनर लायटिंग ४० ते ६५ उडन (लाकडी) ३० ते ४०, कुंदन वर्क २० ते ११०, मोती १० ते ५०, जरदोशिवर ३० ते ३५, चिडा, लुब्बा २२ ते ५० कपल राखी ४० ते ५० पपेट ५० ते ६०, कडा १६५ देवराखी एक डझन ०५, चांदी पॉलिश राखी १२ ते १०० असे दर आहेत.-

# रेती तस्करी ला विरोध केल्याने युवकावर हल्ला

### पोलिसात गुन्हा दाखल आरोपी अटकेत..

**विदर्भ प्रजासत्ताक**



**दि.२८अमरावती -** अवैध रेती तस्करीला विरोध केल्याने अजय कावरे या युवकावर तलवार व कोयत्याने हल्ला केल्याची घटना अमरावती जिल्ह्यातील आसेगाव पोलीस ठाणे अंतर्गत परिसरात घडलि.पोलिसांनी आरोपीला अटक केली असून दोन दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आलेली आहे.अनिकेत वाट हा गावात विरूळपूर्णा येथील नदीवरून रेती तस्करीचा व्यवसाय करत असल्याने या तस्करीला गावातील नागरिकांनी विरोध केला असता याचा वचपा काढत अजय कावरे याला अनिकेत वाट यांनी आसेगाव पूर्णा येथे भेटायला बोलवून त्याच्यावर दहा ते बारा जणांनी तलवार,कोयता व लोखंडी रॉड ने मारहाण केली असा आरोप अजय कावरे याने केला या प्रकरणी आसेगाव पोलीस ठाण्यात अनिकेत वाट सह त्याच्या मित्रावर गुन्हा दाखल झाला असून अनिकेत वाट सह तिघांना पोलिसांनी अटक केली, तसेच त त्याला दोन दिवसाची पोलीस कोठडी देखील देण्यात आली आहे अनिकेत वाट भाजपाचा कार्यकर्ता असल्याचे समजते.

# विक्रमी ९५ हजार हेक्टरवर लागवड

## पश्चिम विदर्भात जिकडे तिकडे मकाच मका..!

### अमरावती आणि बुलढाणा दोन जिल्हे मक्याचे हब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती -** खरीप हंगामात लागवड होणाऱ्या मका पिकाची पश्चिम विदर्भात विक्रमीलागवड झाली आहे. सर्वसाधारण ४५ हजार ४६२ हेक्टर क्षेत्राच्या तुलनेत यंदा सुमारे ९४ हजार ५०२ हेक्टरवर मका क्षेत्र पोहचले असून, त्यामध्ये ९९ टक्के वाटा हा अमरावती आणि बुलढाणा या दोन जिल्ह्यांचा आहे. पश्चिम विदर्भात अमरावती आणि बुलढाणा हे दोन जिल्हे मक्याचे हब म्हणून ओळखले जातात. या दोन्ही जिल्ह्यांसह अमरावती विभागातील इतर जिल्ह्यांमध्ये तीनही हंगामात मका पीक घेतले जाते. अमरावती विभागात मक्याचे सरासरी लागवडीखालील क्षेत्र ४५ हजार ४६२ हेक्टर इतके आहे. त्या तुलनेत सुमारे ९४ हजार ५०२ हेक्टरमध्ये म्हणजे सर्वसाधारण क्षेत्राच्या २०८ टक्के क्षेत्रावर मक्याची लागवड झाली आहे. यामध्ये विक्रमी सर्वाधिक ५० हजार ५७० हेक्टर क्षेत्रावर एकट्या बुलढाणा जिल्ह्यात लागवड झाली आहे. अलीकडच्या चार-पाच वर्षांतील ही सर्वाधिक लागवड आहे.सोयाबीन, कपाशी आणि तूर ही पश्चिम विदर्भातील प्रमुख पिके मानली जातात. त्यापैकी सोयाबीन आणि कपाशी या दोन



पिकांमध्ये गेल्या काही वर्षांपासून उत्पादनखर्चाला परवडणारे दर न मिळणे आणि उत्पादनात वाढ किवा सातत्य न राहणे हे दोन प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभे आहेत. कपाशीत वेचणीचे दर आणि मजुरांचा प्रश्न मोठा आहे. या दोन्ही पिकांच्या तुलनेत गेल्या दोन-तीन वर्षांपासून मक्याचे दर मात्र स्थिर व टिकून असल्याची स्थिती आहे. मक्याची उत्पादकताही चांगली असून सरासरी ३० ते ४० क्विंटलपर्यंत हेक्टरी मका उत्पादन होते.

दर टिकून राहण्यामागे कुक्कुट खाद्य, मुरघास, स्टार्च आणि इथेनॉल यासाठी मक्याचा वापर वाढल्याचे कारण सांगितले जाते. मक्याच्या दाण्यापासून रोजच्या वापरासाठी पशुखाद्यासाठी ५०० हून अधिक प्रकारची उत्पादने बनविली जातात. कोंबड्यांच्या खाद्यामध्ये मक्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो.बुलढाणा जिल्ह्यात मक्याचे सर्वसाधारण क्षेत्र २३ हजार ९९६ हेक्टर इतके आहे. यंदा आतापर्यंत ५० हजार ५७० हेक्टर म्हणजे सर्वसाधारण क्षेत्राच्या २११ टक्के क्षेत्रात मकी। पिकाची लागवड झाली आहे. अमरावती जिल्ह्यात सरासरी २० हजार ६९९ हेक्टरच्या तुलनेत ४३ हजार ४३३ हेक्टर (२१० टक्के) क्षेत्रातमक्याचापेरा आटोपला आहे. अकोला, वाशीम आणि यवतमाळ या तीन जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मक्याला अजून पसंती दिलेली नाही. अकोला जिल्ह्यात केवळ ९७ हेक्टर, वाशीम ३१ हेक्टर आणि यवतमाळ जिल्ह्यात ३७२ हेक्टरमध्ये मका लागवड झाली आहे.

# मेळघाटात श्रावण महिन्यात जिरोती उत्सव, आदिवासींच्या अनेक गावात लागला डोलार

## विविध देवांची कलाकृती गेरू आणि मातीने रेखाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८धारणी–** निसर्गाशी एकरूप होत आदिवासीसंस्कृती मध्ये विविध उत्सव साजरे केले जातात. आषाढ महिन्याच्या अमावास्येच्या दुसऱ्या दिवशी अर्थात श्रावण महिन्याचा पहिला दिवस मेळघाटात आदिवासी बांधव जिरोती या सणाद्वारे साजरा करतात. विशेष म्हणजे गावात डोलार उभारून महिनाभर जिरोती उत्साह साजरा करण्याची परंपरा



आहे.आपल्या कुटुंबात, समाजात महिलांचं महत्त्व हे अनन्यसाधारण आहे. महिलांच्या सन्मानासाठी संपूर्ण श्रावण महिनाभर जिरोती उत्सव साजरा केला जातो. घरात मातीच्या रंगांद्वारे जिरोती मातेचं चित्र रंगवलं जातं. या चित्रात आयुष्याच्या विविध टप्प्यात एक स्त्री आपली जबाबदारी कशी पार पाडते हे रेखाटलं जातं. महिलांच्या कामांचे विविध टप्पे रेखाटले जातात. या कलाकृतीची जिरोती माता म्हणून पूजा केली जाते. जिरोती मातेच्या कलाकृतीत महिलांच्या आयुष्याच्या चित्रासोबतच विविध देवांची कलाकृती गेरू आणि मातीच्या रंगांद्वारे रेखाटली जाते, अशी माहिती आकाश भुसुमकर यांनी दिली.

### पोळ्याच्या करीला विसर्जन

– संपूर्ण श्रावण महिनाभर मेळघाटात चिखलदरा तालुक्यात येणाऱ्या चुर्णी, बिबा, चुनखडी, खडिमल, कुही अशा अनेक गावात डोलार लागतो. पोळ्याच्या करीला हा डोलार फुलांनी सजवला जातो. गावातील महिला छान सजून या झोक्यावर बसून झोका घेत गाणी म्हणतात. सायंकाळी हा डोलार काढला जातो. या डोलार सोबत बांबूच्या फावड्यांची गावात वाजतगाजत मिरवणूक काढली जाते.

गावालगत नदीकाठी त्यांची पूजा करून डोलार आणि पावडे नदीतविसर्जित केले जातात, अशी माहितीदे खील अनिल झामरकर यांनी दिली.

### मुलांना पावड्यावर चालण्याचा आनंद

श्रावण महिन्यात महिला जिरोती उत्सव साजरा करत असताना लहान मुलं दोन बांबूवर पाय ठेवण्यासाठी पायदान तयार करून त्या बांबूद्वारे चालण्यासाठी जे काही तयार करता त्याला पावडे असं म्हणतात. जमिनीला पाय न टेकवता लहान मुलगा या पावड्यांवर चढून चांगला उंच दिसतो आणि त्याद्वारे तो चालण्याचा आनंद घेतो. पावसाळ्यात जंगलात साचणारं पाणी आणि चिखलातून मार्ग काढण्यासाठी पूर्वी अशा पावड्यांचा वापर केला जायचा. आता असा वापर कमी झाला असला तरी श्रावण महिन्यात जिरोती उत्सव साजरा करताना लहान मुलं बांबूचे असे पावडे तयार करून त्यावर चालण्याचा आनंदघेतात.

### असा असतो डोलार

श्रावण महिन्यात देशभर अनेक गावात वडाच्या मोठ्या झाडाला दोरी बांधून झोका घेण्याचा आनंद महिला आणि लहान मुलं घेतात. अगदी अशीच परंपरा मेळघाटात कोरकू समुदायात आहे. मात्र मेळघाट आदिवासी बांधव श्रावण महिन्यात जोझोका बांधतात, तो दोरीचा नसतो तर पूर्णतः तो सागवांच्या लाकडांनं तयार करतात. लाकडाचा हा मोठा झोका बांधण्यासाठी चार किवा दोन खांबांच्या वर आडव्या खांबाला बांधण्याकरिता दोरीचा किवा साखळीचा वापर न करता झाडाची साल वापरूनच हा झोका बांधला जातो. श्रावण महिन्याच्या पहिल्या दिवशी दुपारभर रंगदली सुसूनर हे आदिवासी लोक परंपरेतलं नृत्य पुरुष मंडळी करतात. सायंकाळी गावात डोलार उभारला जातो. जंगलातील विविध पानं, फुलं आणून डोलार सजवला जातो. त्याची पूजा केली जाते आणि नंतर लाकडाच्या या मोठ्या डोलावर एकाच वेळी आठ ते दहा महिला झोका घेत पारंपरिक गीत गातात. जिरोती उत्सव म्हणून महिनाभर सायंकाळी महिला झोका घेत आणि गीत गाऊन आनंद साजरा करतात, अशी माहिती पाटाखेडा या गावातील रहिवासी रमेश चतुरकर यांनी दिली.

# अमरावती जिल्ह्यात १५ पूल नादुरुस्त

## शासनस्तरावर प्रस्ताव धूळखात : ५.६० कोटींचा निधी मिळेना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–**

सावधान, प्रवास करताना आता नागरिकांना प्रचंड खबरदारी बाळगावी लागणार आहे. कारण, जिल्ह्यातील जवळपास ८५.४२ किमींचे रस्ते आणि १५ पुल हे नादुरुस्त आहे. यामुळे येथून प्रवास करणे जीवावर बेतू शकणार आहे. ग्रामीण भागातील सततच्या पावसामुळे अनेक रस्ते व १५ पूल खराब झाले आहेत. मात्र, बांधकाम विभागाकडे शासनाकडून निधी उपलब्ध नसल्यामुळे कोणतेही दुरुस्ती काम सुरू झालेले नाहीत. मागील चार वर्षापासून जिल्हा परिषद शासनाकडे रस्ते व पूल दुरुस्तीसाठी प्रस्ताव सादर करत आहे, परंतु अद्याप निधी मिळालेला नाही. ८५.४२ किलोमीटर रस्ते व पूल दुरुस्तीसाठी किमान ५.६० कोटींची गरज आहे, तरीही शासनाकडून निधी मंजूर झालेला नाही. त्यामुळे कामे अडत आहेत. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीतून निधी मिळण्याची आशा व्यक्त होत आहे.




यंदाही संततधार पावसामुळे अनेक तालुक्यांमधील ग्रामीण रस्ते खरडून गेले आहेत, परंतु शासनाकडून सर्वेक्षणाचे कुठलेही आदेश न मिळाल्याने कुठलीही कार्यवाही सुरू झालेली नाही. मागील वर्षी शासनाकडून न मागता ही बांधकाम विभागाने होता, त्यानुसार रस्ते व पूल दुरुस्तीसाठी सात कोटींची मागणी करण्यात आली होती.

परंतु अद्याप एक पैसाही मिळालेला नाही. २०२३-२४ मध्ये ८५ किमी रस्ते व १५ पूल दुरुस्तीचे प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. मात्र, निरुत्साही शासनाच्या भुमिकेमुळे सध्या या रस्त्याचे काम रखडले आहे. यामुळे जिल्हा परिषदेच्या विभागाकडून या रस्त्याच्या दुरुस्तीबाबतची पाठपुरावा केला जात आहे. मात्र, या प्रस्तावाकडे शासनस्तरावर दुर्लक्ष केले जात आहे.

# कचरा गाडी बांधकाम कंत्राटदराच्या सेवेत कशी ?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८वरुड,** टेंभुरखेडा ग्रामपंचायतला गावातील कचरा गोळा करण्याकरीता स्वच्छ भारत अभियानांतर्गत मिळालेली कचरा गाडी गावातील कचरा गोळा न करता ती कचरा गाडी कंत्राटदाराच्या सेवेत रेती, गिट्टी ने आन करण्यासाठी वापरायला देण्यात आल्यामुळे ते वाहन आता भंगार होण्यास वेळ लागणारनाही. या ग्रामपंचायत प्रशासनाच्या मनमानी कारभारामुळे ग्रामस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त केल्याजात आहे.

टेंभुरखेडा ग्रामपंचायतला स्वच्छ भारत अभियानांतर्गत ग्राम स्वच्छतेकरीता उपलब्ध झालेली कचरा गाडी नियमितपणे घराघरातील कचरा गोळा करण्यासाठी वापरण्यात येत होती. मात्र, काही महिन्यांपासूनती कचरा गाडी थेट कंट्राटदाराच्या बांधकाम कामासाठी वापरली जात असल्याचे दिसुन येत आहे.

याकचरा गाडीने गावातील कचरा गोळा करने सोडून गिट्टी, रेती व बांधकाम साहित्याची वाहतुक करण्याकरीता वापरण्यात येत असल्याचे चित्र दिसुन येत आहे. ही कचरा गाडी बांधकामावर वापरामुळे गाडीमध्ये वारंवार बिघाड होणे, दुरुस्तीसाठी लांबलेली विलंबाची कामगिरी आणि गावातील अस्वच्छतेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर



बनला होता. स्थानिक ग्रामस्थांच्या सततच्या तक्रारींनंतर माजी आमदारांच्या पुढाकारातून नवीन कचरा गाडी मिळविण्यात यश आले. मात्र, त्यानंतरही जुनी गाडी पुन्हा ठेकेदाराच्या वापरात दिसुन येत असल्याने ग्रामपंचायतीच्या अश्या मनमानी कारभारावर ग्रामस्थ नाराज असल्याचे चित्र निर्माणझाले आहे. याप्रकारणाची स्वतंत्रपणे चौकशी होणे अत्यावश्यक आहे. संबंधित प्रशासकीय ग्रामसेवक, अधिकारी यांनी याकडे गांभीर्यान लक्ष न दिल्यास गावकर्यांच्या हक्कांचे नुकसान होणार हे निश्चित आहे. असलेली कचरा गाडी खासगी फायद्यासाठी वापरणं ही गंभीर अनियमितता असून, याला जबाबदार व्यक्तींवर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी आता ग्रामस्थ करू लागले आहे.

# सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये टॉर्टीकॉलीसची शस्त्रक्रिया यशस्वी

## मानेच्या वाकडेपणातून मिळाली रुग्णाला मुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती** – स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशलिटी) येथे टॉर्टीकॉलीस आजारावर शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पुर्ण करण्यात आली.टॉर्टीकॉलीस ही एक अशी स्थिती आहे ज्यात मानेच्या स्नायूंमध्ये ताण येतो आणि त्यामुळे डोके कायम एका बाजुला वळलेले असते. ही जन्मजात किंवा नंतर विकसित होणारी स्थिती असू शकते. यामुळे केवळ शारीरिक त्रासच नाही तर मानसिक त्रास, आत्मविश्वासाची कमतरता तसेच सामाजिक व शालेय जीवनात याचा परिणाम होतो. सदर मुलगी ही १५ वर्षाची असून अकोला येथील रहिवासी आहे. या रुग्णाच्या मानेचे स्नायूजन्मताच आकुंचन पावलेले होते. त्यामुळे डोके एका बाजूला वळलेले होते. वेळेवर उपचार न झाल्यास चेहऱ्याची वाढ असमान होते व मानेला कायमस्वरूपी वाकडेपणा येतो. कधी कधीपाठदुखी, डोकेदुखी आणि दृष्टीदोष देखील होऊ शकतो. रुग्णाची मान वाकलेली असल्याने ही प्रक्रिया अत्यंत कठीण होती. मात्र रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली. त्या रुग्णाची प्रकृती शस्त्रक्रियेनंतर चांगली आहे. ही

> टॉर्टीकालीस ही टाळता येणारी स्थिती आहे. लहान वयात याची लक्षणे दिसतात योग्य तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्या, योग्य व वेळेवर उपचार झाल्यास मोठ्या त्रासापासून बचाव होऊ शकतो.
>
> **डॉ. मकरंद ठाकरे (प्लास्टिक सर्जन)**



शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत विनामूल्य करण्यात आली. विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या सहयोगाने प्लास्टिक सर्जन डॉ. मकरंद ठाकरे यांनी शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. बधिरीकरण तज्ज्ञ डॉ. सपना अग्रवाल, डॉ. माधवी कासदेकर,डॉ. स्वाती डब्बे, शीतल बोंडे, अधिसेविका चंदा खोडके यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर विद्या चुळे, ज्योती गोंडाणे, मनीषा राऊत, श्रद्धा पडोळकर, एलिझा तेलगोटे, रूपाली गवई, नयना राऊत, सुधीर मोहोळ, भरत गावंडे, अर्चना डंबाले, आशिष अत्राम आदींचे शस्त्रक्रियेत मोलाचे योगदान होते.

# बडनेरात ऑनलाईन चक्री जुगारावर पोलिसांची धाड

## ११ जणांना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** बडनेरा शहरातील नवी बस्ती परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर ऑनलाईन चक्री जुगारावर बडनेरा पोलिसांनी धाड टाकून ११ जणांना अटक केली आहे. पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकून मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि रोकड असा एकूण १ लाख २८ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई बडनेरा पोलीस ठाण्याचे एपीआय सुमेध सोनोने यांच्या नेतृत्वाखाली २५ जुलै रोजी सायंकाळच्या सुमारास करण्यात आली. नवी वस्तीतील छत्री चौक परिसरात एका दुकानात हे जुगार अड्डे सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ पथकासह धाड घातली.कार्तिक रमेश पातळवंशी (२५) रा. हरीहरपेठ, बडनेरा, अश्विन सुरेश सोळंकी (२८) रा. जयस्तंभचौक, बडनेरा, तुषार विष्णुपंत पांडे (४९) रा. जयस्तंभ चौक, बडनेरा, नवीनराजुयादव (३१) रा. मनपा शाळेजवळ, बडनेरा, अक्षय गणेश कुरळकर (२६) रा. रामचौक, वलगाव, शेख फईम शेख कलीम (३५) रा. बिसमिल्ला नगर, अमरावती,रितेश राजेंद्र बोबडे (२५) रा. आशियाना, जुनी वस्ती, बडनेरा, चेतन डिगांबर गायगोळे (३८) रा. जुने शहर, अकोला, सौरभ पंजावराव निशानदार (४२) रा. बुधवारा, अमरावती, उमेशमेश्राम (१९) रा. मिलचाळ, बडनेरा, सुनील नथ्थुजी चव्हाण रा. संभाजी नगर, बडनेरा अशी अटकेतील आरोर्षीची नावे आहेत. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून नाईन प्लस ॲन्ड्राईड टीव्ही, किबोर्ड, माऊस, ॲन्ड्राईड गेम बॉक्स, एक वही, एक पेन, कॅल्क्युलेटर, फोन पे स्कॅनर, ८३ हजार रुपये किंमतीचे ७ मोबाइल फोन, नगदी २२ हजार ५९५ रुपये असा एकूण एकूण १,२८,६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटकेतील आरोपींकडून जुगार खेळण्यासाठी इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करून ऑनलाईन चक्री जुगाराचे आयोजन केले जात होते. हा प्रकार अनेक दिवसांपासून सुरू असल्याची शक्यता असूनपोलिस अधिक तपास करत आहेत.

# ७ पीएसआय बनले पदोन्नतीने एपीआय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** पोलिस गृहविभागाने राज्यभरातील ३४१ उपनिरीक्षकांना (पीएसआय) सहायक पोलिस निरीक्षक (एपीआय) म्हणून पदोन्नत केले आहे. पदोन्नतीचा आदेश गृह विभागाने २५ जुलैला काढला आहे. त्यानुसार, अमरावती ग्रामीण पोलिस दलातील पाच व शहर आयुक्तालयात कार्यरत दोन अशा एकूण पोलिस उपनिरीक्षकांना आता सहायक पोलिस निरीक्षक म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे. त्यामुळे त्यांची जिल्ह्याबाहेर बदली झाली आहे. याचवेळी चार नवे एपीआय पदोन्नतीवर शहर पोलिस आयुक्तालयात येणार आहेत.अमरावती ग्रामीणमध्ये कार्यरत पीएसआय सचिन राठोड व अमोल तुळजेवार



यांना सहायक पोलिस परिक्षेत्रात, उपनिरीक्षक राजश्री चंदापुरे व पीएसआय स्नेहल आडे यांची नागपूर शहर तसेच पीएसआय विणा पांडे यांची नवी मुंबई येथे पदोन्नतीवर सहायक पोलिस निरीक्षक म्हणून बदली देण्यात आली आहे. याचवेळी अमरावती शहरात कार्यरत उपनिरीक्षक विजय गिते व विठ्ठल वाणी यांना अनुक्रमे नागपूर शहर व लोहमार्ग मुंबई येथे एपीआय म्हणून पदस्थापना देण्यात आली आहे. याचवेळी अमरावती आयुक्तालयात छत्रपती संभाजीनगर येथून दशरथ आडे, नाशिक शहरातून वर्षा डाळिंबकर, सोलापुरातून नितीन वसावे हे चार पीएसआय शिंदे व नंदुरबार येथून अमरसिंग पदोन्नतीवर एपीआय म्हणून येणार आहेत.

## जीवन विकास विद्यालयात विद्यार्थी संसदेची निवडणूक

# निवडणुकीमध्ये मुख्यमंत्री ,शिक्षणमंत्री, आरोग्य व पर्यावरणमंत्री, क्रीडा मंत्री, सह इतरही सदस्याची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ धारणी –** अंत्योदय मिशन देवग्राम द्वारा संचालित जीवन विकास विद्यालय देवग्राम येथे विद्यार्थी संसदेची निवडणूक नुकतीच पार पडली या निवडणुकीमध्ये मुख्यमंत्री ,शिक्षणमंत्री, आरोग्य व पर्यावरणमंत्री, क्रीडा मंत्री, अर्थमंत्री ,शालेय परिपाठ मंत्री , शालेय शिस्त मंत्री , सांस्कृतिक मंत्री, शालेय पोषण आहार मंत्री, तसेच इतरही सदस्याची निवड करण्याकरिता प्रत्यक्ष मतदान पद्धतीने ही निवडणूक दिनांक २६ जुलै २०२५ ला सकाळी नऊ ते साडेअकरा वाजेपर्यंत पार पडली .

**विद्यार्थी निवडणूक कार्यक्रम–** शालेय निवडणूक आयोगाची स्थापना करून शालेय निवडणुकीचा कार्यक्रम घोषित करण्यात आला त्यानंतर






निवडणुकी करिता उमेदवारी अर्ज दाखल करणे त्याची छाननी करणे उमेदवाराचे नाव घोषित करणे आक्षेप घेणे व निवडणुकीची प्रत्यक्ष मतदानाची तारीख व मतमोजणीचा निकाल घोषित करण्याची तारीख असा कार्यक्रम विद्यार्थ्यांना देण्यात आला.

**या मंत्री पदाकरीता उभे केले विद्यार्थी उमेदवार**

मतदानाद्वारे मुख्यमंत्री पदासाठी तीन उमेदवार शिक्षण मंत्री पदासाठी तीन उमेदवार आरोग्य व पर्यावरण मंत्री याकरिता तीन उमेदवार . शालेय पोषण आहार मंत्री तीन उमेदवार शालेय शिस्त मंत्री क्रीडामंत्री अर्थमंत्री शालेय परिपाठ मंत्री सांस्कृतिक मंत्री अशा उमेदवारासाठी प्रत्यक्ष मतपत्रिका देऊन मतपत्रिकेवर विविध चिन्हांकित चिन्हासमोर खून करून मतदान करण्याचा आनंद विद्यार्थ्यांनी लुटला .शाळेच्या एकूण २०२ मतदारांपैकी प्रत्यक्ष १४५ विद्यार्थ्यांनी मतदानाचा हक्क बजावला मतदानाची टक्केवारी ही ७१ एकाहत्तर टक्के होती.

**विद्यार्थी व शिक्षक होते निवडणूक अधिकारी**

निवडणूक आयोगाचे काम कृतिशील शिक्षक राम बोंद्रे व मदन ढोले यांनी पार पाडले तर निवडणूक केंद्राध्यक्ष म्हणून प्रणय बारमासे निवडणूक अधिकारी नंबर एक प्रज्ञा हिंजेवार निवडणूक अधिकारी नंबर दोन पवित्रा कोकाटे निवडणूक अधिकारी नंबर तीन समर्थ दंडारे व सुरक्षा रक्षक म्हणून सागर युवनाते यांनी काम बघितले भारत देश हा जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश असून इथे प्रत्यक्ष मतदान पद्धतीने देशाचा कारभार चालवण्यासाठी खासदार आमदारां ची निवडणूक होते या निवडणुकी ची उत्सुकता या लहान मुलांमध्येही विद्यार्थ्यांमध्येही निर्माण होते आणि त्यांच्यामध्ये हीच जाणीव जागृती मतदानाचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या दृष्टिकोनातून ही मतदान पद्धती शाळेमध्ये वापरण्याचा व त्या माध्यमातून शालेय मंत्रिमंडळ निर्माण करण्याचा प्रयत्न या निवडणुकीतून झाला आहे या निवडणुकीकरिता मुख्याध्यापक संजय लायदे मुख्याध्यापक रविकांत बाविस्कर संदीप फुके प्रमोद बैस नरेंद्र बिहार राहुल कोरडे सुषमा बढीये जयश्री वासाडे पायल बाणाईत आरती नागमोते श्रीधर मानकर प्रमोद पांगुळ कल्पना सोनवणे दुर्गा इंगळे मेघा कांबळे इत्यादींनी परिश्रम घेतले असून या निवडणुकीचा निकाल बुधवार दिनांक ३० जुलै २०२५ ला जाहीर होणार आहेत .

### संसद निवडणुकीचा हा होता उद्देश



विद्यार्थ्यांना मतदान करण्याविषयीची जाणीव जागृती निर्माण व्हावी त्यांचा उत्साह वाढवा तसेच मतदानाची सर्व प्रक्रिया माहिती करून घेण्यासाठी शालेय मंत्रिमंडळ बाल संसदेच्या रूपाने या मतदान पद्धतीने निर्माण करण्यात आले संपूर्ण शाळेचा कारभार विविध मंत्री व खात्यामार्फत विद्यार्थ्यांनी चालवावा हाच यामागचा प्रमुख उद्देश, होता असे मत शाळेचे मुख्याध्यापक संजय लायदे यांनी व्यक्त केले.निवडणूक आयोगापासून तर निवडणुकीचा सर्व कार्यक्रम शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनीच राबवला मतदान अधिकारी तसेच मतमोजणी अधिकारी इत्यादी ही सर्व प्रक्रिया निवडणूक आयोगाप्रमाणे विद्यार्थ्यांनीच राबवली त्यामुळे ते विद्यार्थ्यांना निवडणूक आयोगाचा कारभार व प्रत्यक्ष मतदान याचा अनुभव प्रत्यक्ष घेता आला .

**राम बोंद्रे कार्यक्रम प्रभारी शिक्षक–**

# अमरावती शहरालगतच्या डोंगरांमध्ये ५ हजार वर्षांपासून उभे आहे कोंडेश्वर मंदिर




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

कोंडेश्वराचे मंदिर विदर्भ राजाच्या काळात उभारण्यात आल्याचे सांगण्यात येते. सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी या परिसरात राज्य असणाऱ्या विदर्भ राजा हे काशी क्षेत्रातील भगवान विश्वेश्वराचे भक्त होते. या विदर्भ राजाने आपल्या विदर्भ प्रदेशात कौंडिय मुनीच्या आग्रहावरून शिवलिंगाची प्राणप्रतिष्ठा केली. या शिवलिंगाला कोंडेश्वर असे नाव देण्यात आले.आज पहिल्या श्रावण सोमवार निमित्य या मंदिरात भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती.

**असा आहे कोंडेश्वर मंदिराचा इतिहास :** कोंडेश्वराजवळ प्राचीन काळी अनेक वेळा काशी ,प्रयागराज, ओमकारेश्वर आणि अन्य स्थानावरून ऋषीमुनी, वेदशास्त्र संपन्न ब्राह्मण, साधुसंत, भाविक, शिवभक्त येत असत. यामुळेच शिव उपासनेचा सुगंध या परिसरात सर्वत्र आजही दरवळतो. अनेक राज्यसत्तांच्या काळात श्रीक्षेत्र कोंडेश्वराचा उत्कर्ष झाला. वाकाटक आणि गुप्तकाळात कोंडेश्वर येथील मंदिराची प्रतिष्ठा वाढली. रामदेवराव यादव आणि कृष्णदेवराव यादव या घराण्यातील राज्य सत्तेच्या काळात त्यांचे पंतप्रधान असणाऱ्या हेमांद्रीपंत यांनी अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. त्यापैकीच त्यांनी कोंडेश्वर येथील विद्यमान मंदिर राज्यसत्तेच्या खर्चाने बांधले. या मूळ मंदिराला लावलेले शिलाखंड व त्यावरील कोरीव काम पाहता यावर दक्षिणेकडील कलाकृतीचा पगडा असल्याचे दिसते.

**कोंडेश्वराला मनाचे स्थान :** यादवकाळानंतर ४०० वर्षांनी औरंगजेबाच्या मोगली सत्तेत इतर मंदिरांप्रमाणे कोंडेश्वरच्या मंदिरालाही अवकळा प्राप्त झाली होती. अमरावतीकर भोसलेंच्या ताब्यात हा भाग आल्यावर कोंडेश्वराला पुन्हा मनाचे स्थान मिळाले. माधवराव पेशव्यांच्या काळात अभिषेक, शिवलीलामृत पाठ, अन्नदान, नाम सप्ताह अशा धार्मिक विधी वाढल्याने कोंडेश्वराचे महात्म्य पुन्हा एकदा वाढले. काळ्याभोर पाषाणाचे चिरे एकावर एक रचून हे मंदिर बांधण्यात आले. हेमाडपंथी स्वरूपात उभारण्यात आलेल्या या मंदिराची उंची पूर्वी १२ फूट इतकीच होती. पुढे या मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात आला. त्यावेळी पूर्वी असणाऱ्या काळापाषाणाचाच वापर करून मंदिराची उंची ७५ फूट करण्यात आली.

**जागृत देवस्थान :** कोंडेश्वर हे विदर्भातील काही प्रसिद्ध घराण्यांचे कुलदैवत ही मानले जाते. भाविक कोंडेश्वराच्या गाभारा जलामृत्ताने भरण्यासाठी अनेकदा प्रयत्न करतात. कोंडेश्वरावर पाण्याची सतत धार सुरू राहते. मात्र, कोंडेश्वराचे लिंग पूर्णपणे पाण्यात कधीही बुडत नाही. मंदिरातील पाणी बाहेर जाणार नाही याची सर्व दक्षता घेतली जाते. गाभाऱ्याचा तळ भाग चुन्याचा पक्का बनविला असतानाही हजारो लिटर पाणी नेमके कुठे जाते याचा शोध आजवर लागलेला नाही. कोंडेश्वर हे जागृत देवस्थान असल्याची मान्यता आहे. गाभाऱ्यात कोंडेश्वर बारा ज्योतिर्लिंगाच्या प्रतिमांची स्थापना देखील करण्यात आली आहे.

**दगडावर कोरलेल्या हत्तींचे वैशिष्ट्य :** कोंडेश्वर मंदिराच्या बाहेरून बसविलेल्या दगडी चिऱ्यांवर अगदी पायथ्याशी हत्ती कोरलेले आहेत. अतिशय कलात्मक रचना असणाऱ्या या हत्तींच्या दोन शरीरांना एक मूक तर काही ठिकाणी दोन मुखांना एकच हत्तीचा देह दिसतो . यामुळे या कोरलेल्या हत्तींची निश्चित संख्या किती हे समजणे कठीण आहे. हे हत्ती एका बाजूने मोजत गेल्यास या हत्तींची जेवढी संख्या भरते तेवढीच संख्या दुसऱ्या बाजूने मोजत गेल्यास भरत नाही.

**तपश्चर्या करणारा नंदी :** कोंडेश्वराच्या गाभाऱ्याकडे जाताना एक भला मोठा नंदी गाभाऱ्याच्या खाली उतरणाऱ्या द्वारासमोर आहे. अग्र पूजेचा मान असणाऱ्या नंदीची बैठक ही जणू तो तपश्चर्या करीत असल्याचाच भास होतो. कोंडेश्वराच्या मंदिर परिसरात अति पुरातन काळातील गणपती मंदिर आणि हनुमानाचे मंदिर देखील आहे.

**महाशिवरात्रीला भरते यात्रा :** श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी कोंडेश्वराच्या दर्शनासाठी भाविकेची येथे वर्दळ असते. महाशिवरात्रीच्या पर्वावर मात्र कोंडेश्वरला भव्ययात्रा भरते. अमरावती जिल्ह्यासह नागपूर, यवतमाळ, वर्धा या जिल्ह्यातील शेकडो भाविक कोंडेश्वराच्या दर्शनासाठी येतात. कोंडेश्वर मंदिराच्या बाजूलाच कैलास टेकडी आहे हा संपूर्ण परिसर निसर्गरम्य आहे.

# सातपुड्यात पोहोचले ड्रोनद्वारे मेडिसिन
## राज्यातला दुसरा प्रयोग यशस्वी





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८नंदुरबार**

राज्यात अतिदुर्गम जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गडचिरोलीनंतर नंदुरबारची ओळख आहे. नंदुरबार जिल्ह्यात आरोग्याच्या मोठ्या प्रमाणावर समस्या निर्माण होत आहेत. त्या दूर व्हाव्यात याकरिता प्रशासनाकडून दुर्गम भागात रस्त्यांअभावी प्राथमिक आरोग्य केंद्रांपर्यंत औषधी पोहोचविण्यासाठी मोठी मशागत करावी लागत होती. रुग्णांवर वेळेवर उपचार व्हावेत, या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून ड्रोनद्वारे प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा उपकेंद्रांपर्यंत फक्त १५ मिनिटांत औषधी पोहोचविल्या जातील, असा प्रयोग यशस्वी करण्यात आला आहे. यामुळे दुर्गम भागातील नागरिकांना आरोग्याबाबत येणाऱ्या समस्या काही प्रमाणात कमी होतील. म्हणून हा राज्यातील दुसरा यशस्वी प्रयोग राबविण्यात आला.

नंदुरबार जिल्ह्यातील सातपुड्यात अनेक समस्या आहेत. अतिदुर्गम भाग असल्यामुळे अनेक पाड्यांपर्यंत पोहोचण्यासाठी रस्ता नाही, तर नदी ओलांडण्यासाठी पूल नाही. यामुळे आरोग्य सेवा पोहोचवणे मोठे जिकरीचे झाले होते, यामुळे आरोग्य विभागासमोर नेहमीच मोठे आव्हान राहिले आहे. बिलगाव आरोग्य केंद्र असो की सावऱ्या दिगर यांसारख्या गावांमध्ये जाण्यासाठी ग्रामस्थांना मोठ्या समस्या निर्माण होत होत्या. नदीतून होडी किंवा बार्जद्वारे प्रवास करावा लागतो. आरोग्य कर्मचाऱ्यांना तर अनेकदा २० किलोमीटरहून अधिक पायपीट करून रुग्णांपर्यंत पोहोचून त्यांना लस आणि औषधं उपलब्ध करून दिली जात होते, यासाठी सुमारे ४ तासांपर्यंतहून अधिक वेळ लागत होता. यामुळे लसींच्या योग्य तापमानावर परिणाम होऊन त्या खराब होण्याची भीती असायची. याच समस्येवर उपाय म्हणून जिल्हा प्रशासन आणि मुंबई आयआयटीने एक महत्त्वाकांक्षी प्रयोग हाती घेतला. तो म्हणजे ड्रोनद्वारे मेडिसिन आणि लसींचा पुरवठा करून आरोग्य सेवकांपर्यंत ते पोहोचवले जाणार आहे.

**दुर्गम भागात फायदेशीर ठरणार**

आयआयटी टीम मुंबई यांनी महाराष्ट्र शासनाच्या मदतीने हा ड्रोन निर्मित केला असून, हा ड्रोन डिलिव्हरी ड्रोन म्हणून बनवला आहे. याची क्षमता सुमारे दोन किलो आहे. सदर ड्रोनला मोबाईलद्वारे कंट्रोल केले जाऊ शकते. मोबाईल नेटवर्कचे जाळे पसरल्यामुळे ड्रोन कॅमेरा आरामात पोहोचू शकतो. यात कॅमेरादेखील आहे, त्या कॅमेऱ्याद्वारे कुठल्या दिशेने जावे हेदेखील ऑपरेटरर्सच्या निदर्शनास येणार आहे. याची पहिली चाचणी यशस्वी करण्यात आली आहे. पायी गेल्याने सुमारे दीड ते दोन तास लागतात, मात्र याच ड्रोनद्वारे आम्ही १० ते १२ मिनिटांत सदर औषधं पोहोचवत आहोत. यामुळे येथील नागरिकांना याचा मोठा फायदा होणार आहे, असे मत आयआयटी मुंबई येथील आयुषी राजगोर यांनी व्यक्त केलंय.

# महावितरणची थकबाकी पोहचली १५६ कोटीवर
## अधिक्षक अभियंता ते जनमित्र सर्वांना थकीत बिल वसूलीचे उद्दिष्ठ
### आता ग्राहकचा वीज पुरवठा खंडित होणार




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

महावितरण अमरावती परिमंडळात वीज बिलाची थकबाकी कमी न होता दिवसेंदिवस त्यात वाढ होत आहे. मार्च २०२५ मध्ये असलेली ७५ कोटीची थकबाकीत वाढ होवून जुलै २०२५ मध्ये १५६ कोटी झाली आहे. त्यामुळे वीजबिलाच्या वसुलीसाठी अधीक्षक अभियंता ते जनमित्र सर्वांना ग्राहकनिहाय थकीत वीजबिल वसूलीचे उध्दीष्ठ देण्यात आले असल्याची माहिती मुख्य अभियंता अमरावती परिमंडळ यांनी दिली आहे.

महावितरणचे अस्तित्व हे वीजबिलांच्या महसूलावरच अवलंबून आहे. परंतू मार्च २०२५ नंतर प्रत्येक महिन्यात अपेक्षीत महसूलाच्या उद्दिष्टाप्रमाणे बिलांची वसूली झालेली नाही,त्यामुळे थकबाकी कमी न होता त्यात वाढ झाली आहे. ही गंभीर बाब असून महावितरणच्या आर्थिक स्थैर्यासाठी वीजबिल वसूलीशिवाय अन्य पर्याय नाही. त्यामुळे थकबाकी आणि चालू वीजबिलाच्या वसुलीवर परिणाम होत असेल तर वीज पुरवठा खंडित करण्याशिवाय पर्याय नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.परिमंडळात विविध वर्गवारीतीस ३ लाख ८१ हजार ४०६ ग्राहककांकडे असेलल्या १५६ कोटी रूपयाच्या थकीत रकमेत अमरावती जिल्ह्यातील १ लाख ९०९३६ ग्राहकाचा समावेश असून त्यांच्याकडे ६७ कोटी ३९ लाख रूपयाचे आणि यवतमाळ जिल्ह्यातील १ लाख ९०४७० ग्राहकांकडे ८८ कोटी ८१ लाख रूपयाची वीज देयके थकली आहे.तसेच परिमंडळात १ लाख रूपयापेक्षा जास्त थकबाकी असलेल्या ग्राहकाची संख्या ११५७ असून त्यांच्याकडे ३२ कोटी ६७ लाख रूपये थकीत आहे.यामध्ये अमरावती जिल्ह्यातील ४७२ आणि यवतमाळ जिल्ह्यातील ६५५ ग्राहकाचा समावेश असून त्यांच्याकडे अनुक्रमे १४.१७ कोटी आणि १८.५५ कोटी थकीत आहे.त्यामुळे अधीक्षक अभियंता ते जनमित्र यांना वसूलीचे उध्दिष्ठ देण्यात आले असून १ लाख रूपयापेक्षा जास्त थकबाकी असणारे ग्राहकाची तपासणी अधीक्षक अभियंता,५० हजार ते १ लाख रूपयापर्यंत थकबाकी असलेल्या ग्राहकाची वसूलीचे उध्दिष्ट कार्यकारी अभियंता यांना देण्यात आले असून २५ ते ५० हजार रूपयाची थकबाकी असणारे ग्राहक उपकार्यकारी अभियंता,५ हजार ते २५ हजार थकबाकीवाले ग्राहक शाखा अभियंता आणि ५ हजारापरर्यंत थकबाकी असलेल्या ग्राहकाच्या थकबाकीची वसूलीचे उध्दिष्ट जनमित्रांना देण्यात आले आहे.ग्राहकांची वीजबिल भरण्याची उदासिनता बघता महावितरणकडून नाईलाजास्तव वीज पुरवठा खंडित करण्याची कारवाई सक्रीय करण्यात आली आहे.थकबाकी वसुलीसाठी वरिष्ठ अधिकारीही फिल्डवर उतरले आहे.तसेच आगामी दिवसं हे सणासुदीचे असल्याने महावितरणची कटू कारवाई टाळण्यासाठी थकबाकी आणि वेळेत वीजबिल भरून सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# अंजनगाव बसस्थानक परिसरात ऑटोचालकांची मुजोरी वाढली
### बसस्थानाकात ऑटो नेऊन भरतात प्रवाशी; कारवाई केली तर करतात हुज्जत; पोलिस विभाग लक्ष घालणार का?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी बसस्थानक परिसरात अवैध प्रवाशी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून यात ऑटो धारक चालक तर स्थानाकाच्या गेट वर ऑटो प्रवाशी भरण्यासाठी उभी करतात तर काही ऑटो वाले तर थेट बस स्थानाकात जाऊन प्रवाशी ऑटोत भारतात कोणी त्यांना हटकले तर ते हुज्जत घालतात यावर पोलिसांनी कडक करावी करण्याची गरज निर्माण झाली असून बस स्थानकाच्या संरक्षण भिंतीलागत महिनो गिनती उभे राहत असलेल्या ऑटोवर सुद्धा कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे

रविवारी (ता.२७) बस स्थानाकाच्या आत तीन ते चार ऑटो प्रवाशी भरत असतांना ट्रॅफिक पोलिसांना दिसले त्यांनी हटकताच दोन ऑटो लगेच पळून गेले व एक ऑटो पोलिसांच्या हाती लागला त्याला कारवाई साठी पोलिसाने थांबवले असता परिसरातील पंधरा ते विस ऑटोवाले जमा झाले व पोलिसांशी हुज्जत घालू लागले नेमक्या यावेळी या ठिकाणी उपस्थित असलेल्या पत्रकाराने त्यांचा फोटो काढला तेव्हा हे ऑटोवाले त्या पत्रकारांशी हुज्जत घालू लागले तू आमचा फोटो का काढला असे बोलू लागले गरमागरमी वाढली असतांना पोलिसांनी कारवाई करत ऑटो कारवाई करण्यासाठी थेट पोलीस स्टेशन मध्ये नेला अश्या अवैध प्रकारावर नित्याने कारवाई अपेक्षित असून मुजोर ऑटोवाल्यांच्या मुसक्या आवळने गरजेचे असल्याचे मत अनेकांकडून व्यक्त केल्या जात आहे.

> बसस्थानाकात अवैध रित्या प्रवाशी भरणाऱ्या ऑटोचालकावर करावी केली असून या भागात आता यापुढे जातीने लक्ष ठेवायला सांगितले असून स्थानकाच्या गेटवर उभी राहणारी ऑटो व रस्त्याच्या मधोमध ऑटो उभी करून प्रवाशी भरणाऱ्यांवर कडक करावी करण्यात येईल.
>
> **सुरज तेलगोटे**
> **पोलीस निरीक्षक अंजनगाव सुर्जी.**

**ऑटोवाल्यांनी बनवला पार्किंग झोन**

बस स्थानकाच्या संरक्षण भिंतीलागत मुख्य मार्गावरील फुटपाथ वर महिनोगिनती काही ऑटो एकाच ठिकाणी उभे केलेले असून यामुळे नागरिकांना रस्त्यालागत पायी चालण्याची वाट या ऑटो पार्किंग च्या घशात गेली असल्याचा प्रकार येथे होत असून त्या उभ्या असलेल्या ऑटो समोर ऑटोचालक मुख्य रस्त्यावर ऑटो उभे करून प्रवाशी भरतात यावर आणि जे ऑटो महिनोगिनती या सार्वजनिक परिसरात उभे आहेत यावर पोलिसांनी तातडीने कारवाई करण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे

# ३री युथ फायटर ओपन तायक्कॉन्डो आंतरराष्ट्रीय चाम्पीयशनशिप स्पर्धेला सुरुवात
## राणा दाम्पत्यांच्या हस्ते थाटात उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

लहानपणा पासुन मुला - मुलींना स्वताची सुरक्षा करता यावी या उद्देशाने तायक्कॉन्डो या खेळाच्या प्रकारात भारतातील अनेकांनी प्राविन्य मिळविले असून त्या अनुषंगानेच अमरावती जिल्हयातील लहान व तरुणांना खेळामध्ये प्रोत्साहन मिळावे व उत्साह निर्माण व्हावा या उद्देशाने युथ स्पोट्स फाऊंडेशन अमरावती व्दारा ३ीव युथ फायटर ओपन तायक्कॉन्डो आंतरराष्ट्रीय चाम्पीयशनशिप २०२५ जिल्हा स्टेडीयम अमरावती येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये अमरावती जिल्हयासह नागपुर, वर्धा, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, भंडारा, गोदिंया अशा अनेक जिल्हयातुन मुलांनी सहभाग घेतला होता. याच आंतरराष्ट्रीय चाम्पीयशनशिप २०२५ उद्धाटन आ.रवि राणा व भाजपा नेत्या मा.खा.नवनित राणा यांच्या हस्ते करण्यात आले असून यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन भाजपा शहर अध्यक्ष डॉ.नितीन धांडे उपस्थित होते. विशेष म्हणजे या स्पर्धेमध्ये आ.रवि राणा व नवनित राणा यांचे सुपुत्र रणविर रवि राणा यांनी सुध्दा या आंतरराष्ट्रीय चाम्पीयशनशिप २०२५ स्पर्धेमध्ये आपला सहभाग दर्शविला होता. या स्पर्धेमध्ये अनेक लहान मुलांनी आपल्या खेळाने उपस्थित पाहुण्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी खर्या अर्थाने अशा साहशी खेळ खेळण्याची आवश्यकता प्रत्येक लहान मुलाला व मुलीला आवश्यक प्रत्येक लहान मुलाला व मुलीला आवश्यक असल्याचे आ.रवि राणा यांनी सांगीतले, तसेच प्रत्येक आई - वडीलांनी आपल्या मुला-मुलींना अशा साहशी खेळासाठी प्रोत्साहीत करण्याचे आवाहन मा.खा.नवनित रवि राणा यांनी केले. यावेळी श्री.सुनिल राणा, जिल्हा क्रिडाअधिकारी गणेश जाधव, डॉ.तनुजा राऊत, युथ स्पोट्स फाऊंडेशन अध्यक्ष राजेंद्र तायडे, तसेच आयोजक बलवंत बोबडे, धनराज देवहाते, गौरव सर्वत्रकर, मंदा रोकडे, इंगोले साहेब, ज्ञानेश्वर कुचे उपस्थित होते.

# पंचायत समिती चांदूर रेल्वेला राज्यात द्वितीय क्रमांकाचा सन्मान - अमरावतीत भव्य सत्कार समारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८चांदुर रेल्वे**

महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेअंतर्गत राज्यभरातील विविध जिल्ह्यांच्या कार्यालयांचे कार्यप्रदर्शन तपासण्यात आले. या मूल्यांकन प्रक्रियेत अमरावती जिल्ह्यातील पंचायत समिती चांदूर रेल्वे यांनी उल्लेखनीय कामगिरी करत संपूर्ण राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला. या सन्मानार्थ अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित एका भव्य कार्यक्रमात समितीचे प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. त्यांच्या सोबत विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी मॅडम, जिल्हा परिषदेचे अधिकारी, आणि लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमात गटविकास अधिकारी श्री. संजय खारकर,विस्तार अधिकारी पंचायत श्री सुरेश चव्हाण, अधिक्षक श्री. गजेंद्र पाटील व स्वच्छ भारत मिशनचे तालुका समन्वयक श्री. राहुल गवई यांनी पंचायत समितीच्या वतीने प्रशस्तीपत्र स्वीकारले.

या मोहिमेअंतर्गत कार्यालयीन प्रक्रिया, पारदर्शकता, नागरिकांना सुविधा देण्यात येणारी तत्परता, कामाचा गतीमान वेग, कागदपत्र व्यवस्थापन, डिजिटल सेवा यामध्ये पंचायत समितीने आपले कार्य उत्कृष्टपणे पार पाडले.

या गौरवप्रसंगी खासदार डॉ. अनिलभाऊ बोंडे, माजी पालकमंत्री प्रवीणभाऊ पोटे, आमदार डॉ. नितीनजी धांडे, तसेच इतर आमदार, पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. त्यांनी चांदूर रेल्वे पंचायत समितीच्या या यशाचे कौतुक करत भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

गटविकास अधिकारी श्री. संजय खारकर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, हा सन्मान हा केवळ माझा नव्हे, तर संपूर्ण पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांचा, सहकार्यांचा आणि आमच्या मार्गदर्शक वरिष्ठ अधिकाऱ्यांचा आहे. आम्ही भविष्यातही अशीच पारदर्शक व जनहितकारी सेवा देण्याचा प्रयत्न करू.

या यशामुळे चांदूर रेल्वे तालुक्याचा व अमरावती जिल्ह्याचा सन्मान संपूर्ण राज्यभरात उंचावला आहे. ही कामगिरी भविष्यातील इतर शासकीय कार्यालयांसाठी प्रेरणादायी ठरणारी आहे.

# शाळा शिकस्त, विद्यार्थ्यांना वर्ग नाहीत, प्रशासनाकडून पत्रांची बोळवण

## जिल्ह्यातील शाळांचे विदारक वास्तव, पावसाळ्यापूर्वीही वर्गखोल्यांची डागडुजी नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद शाळा आजही शिकस्त अवस्थेत असून पावसाळ्याच्या तोंडावरही वर्गखोल्यांची डागडुजी करण्यात आली नाही. परिणामी, शाळा सुरु झाल्यावर विद्यार्थ्यांना बसण्याकरिता वर्गच उपलब्ध नसल्याचे चित्र आहे. मात्र, जिल्हा परिषद प्रशासनाने एक पत्रक काढून जबाबदारी झटकण्याचा प्रकार केल्याने शिक्षण व्यवस्थेतील ढिसाळ नियोजन पुन्हा एकदा समोर आले आहे. शिक्षण विभागाकडून गटशिक्षणाधिकाऱ्यांना पाठवण्यात आलेल्या पत्रकात आपत्ती व्यवस्थापनासंदर्भातील दिशा-निर्देश देण्यात आले आहेत. यात भूकंप, आग, पूर यासारख्या आपत्तींच्या काळात विद्यार्थ्यांचे संरक्षण कसे करावे, याचे तपशीलवार आदेश आहेत. परंतु, सध्याच्या विदारक स्थितीत सर्वात गंभीर बाब म्हणजे शाळांच्या शिकस्त वर्ग खोल्यांची दुरवस्था. अनेक शाळांमध्ये वर्ग भंगलेले, छत गळणारे तर काही ठिकाणी चारही भिंतींविना शिकवणी सुरू असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. ज्या वर्गखोल्या जीवघेण्या बनल्या आहेत, त्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यास सांगितले गेले आहे; मात्र त्या दुरुस्त करणे ही जबाबदारी जिल्हा परिषद प्रशासनाची असतानाही त्यांनी ती मुख्याध्यापकांच्या खिशात टाकण्याचा प्रयत्न केला आहे. एकूणच, जिल्हा परिषदेने सूचना पाठवून कर्तव्य पार पाडल्याचे दाखवले असले तरी विद्यार्थ्यांना







सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज शैक्षणिक वातावरण मिळण्यासाठी प्रत्यक्ष पावले उचलली गेली पाहिजेत. अन्यथा, ही दिशा-निर्देशांची कागदपत्रे विद्यार्थ्यांच्या भविष्यावर केवळ बोळवण ठरेल!समाजमंदिर, अंगणवाडीत शिक्षण घ्या!पत्रकात असाही उल्लेख आहे की, जर शाळेत वर्ग उपलब्ध नसतील, तर विद्यार्थ्यांना समाजमंदिर, अंगणवाडी किंवा इतर जागी शिकवावे. शासकीय शिक्षण यंत्रणा कोसळल्याचे हे जिवंत उदाहरण आहे. इतकेच नव्हे, तर प्रत्येक शाळेत अग्निशामक यंत्र असावे, त्याची रिफिलिंग करावी, विज्ञान प्रयोगशाळेतील साहित्य सुरक्षित ठेवावे, अशा निर्देशांचे ढीग पत्रात दिलेले असले तरी त्या मागे निधी, अंमलबजावणी व उत्तरदायित्व या मूळ प्रश्नांची उत्तरंच नाहीत. मुला-मुलींच्या स्वच्छतागृहांची स्वच्छता राखावी, अशा सूचनाही या पत्रात आहेत. पण प्रत्यक्षात किती शाळा यांचे पालन करतात? आणि ते तपासणारे कोठे आहेत?

**शाळा दुरुस्ती रखडली**

विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारातअमरावती जिल्ह्यात जिल्हा परिषद शाळांच्या ४१० वर्गखोल्या शिकस्त असून, त्यातील दुरुस्ती आणि नवीन बांधकामांसाठी तब्बल २६ कोटी ७५ लाखांची तरतूद आहे. यामध्ये १४ कोटी ४० लाख ५० हजारांची रक्कम दुरुस्तीकरिता मंजूर झाली असून, १२ कोटी ३५ लाखांची नवीन इमारतीसाठी तरतूद आहे. मात्र, पावसाळा सुरू झाल्याने केवळ ४९ कामे पूर्ण झाली असून, बहुतांश कामे रखडली आहेत. सध्या ५७ कामे प्रगतीपथावर असली तरी ३०७ कामांसाठी अद्याप आदेश प्रक्रियेत आहेत. त्यामुळे शाळा सुरू असूनही विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी सुरक्षित वर्ग नाहीत, हे वास्तव चिंताजनक आहे.

**मंत्र्यांच्या व्हीसीतून सुचना**

२५ जुलै रोजी शिक्षण विभागाने जारी केलेल्या पत्रात मा. मंत्री महोदय यांच्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे प्राप्त सूचनांनुसार आपत्ती व्यवस्थापनाची कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, प्रत्यक्षात जिल्ह्यातील शेकडो शाळा शिकस्त अवस्थेत असून विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात आहे. व्हीसीतून सूचनांचा वर्षाव झाला असला तरी त्या अंमलात आणण्यासाठी आवश्यक निधी, निर्णयक्षमता व गती यांचा अभाव असल्याचे जाणवते.


> अमरावती जिल्हातील जि.प.शाळांच्या शिकस्त खोल्या पाडल्या गेल्या नाही. पावसाळ्यापूर्वी शाळांच्या वर्ग दुरूस्ती केली नाही. त्यामुळे विद्यार्थांना बसण्याकरीता जागा नाही. प्रशासनाने असे पत्र काढून मोकळे झाले. वर्ग दुरूस्ती करण्याची जबाबदारी जि.प.प्रशासनाची आहे. याकडे लक्ष देणे गरजेची आहे.राजेश सावरकर, राज्य प्रसिध्दी प्रमुख.महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती.कोट-ही संपूर्ण इमारतच धोकादायक आहे. डिस्मेंटलचा प्रस्ताव दोन-तीन वर्षांपूर्वी पाठवला होता, पण अद्याप ठोस निर्णय नाही. केवळ दोन खोल्यांचे काम संथगतीने सुरू आहे. विभाग निर्णायक पावले उचलत नाही.-अजय सुरटकार, अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समितीकोट-शाळा इमारतीसंदर्भात माहिती घेतली असून दोन नवीन वर्गखोल्यांचे काम सुरू आहे. आवश्यकता भासल्यास अतिरिक्त निधीही उपलब्ध करून दिला जाईल.
>
> **- डॉ. नितीन उंडे, गटशिक्षणाधिकारी**

# तिन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांना मिळणार अवकाळी नुकसानीचा निधी

### आ.प्रतापदादा अडसड यांचे प्रयत्न; मुख्यमंत्र्याची घेतली होती भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८धामणगाव रेल्वे**

जिल्ह्यात एप्रिल व मे महिन्यात अवकाळी पाऊस व गारपिटीने १४ हजार हेक्टरमधील फळपिके व भाजीपाला पिकांचे ३३ टक्क्यांवर नुकसान झाले होते.२७ कोटींचा निधी शासनाने मंजूर केल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आमदार प्रतापदादा अडसड यांनी भेट घेऊन निधीची मागणी केली होती



एप्रिल व मे महिन्यात धामणगाव रेल्वे ,चांदुर रेल्वे नांदगाव खंडेश्वर या तीन तालुक्यात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पालेभाज्या तसेच फळभाज्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते त्यामुळे तिन्ही तालुक्यासह जिल्ह्यातील शेतकऱ्यांना भरीव निधी मिळावा म्हणून धामणगाव चे आमदार प्रतापदादा अडसड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या समस्या मांडल्या होत्या त्यामुळे आमदार प्रतापदादा अडसड यांच्या मागणीची दखल घेत जिल्ह्यासाठी २७कोटींचा निधी शासनाने मंजूर केला आहेमे महिन्यातील नुकसानीसाठी चांदूर रेल्वे ९७,८७,०७० रु., धामणगाव ५९,०२,०६० रु., नांदगाव ९२,१८,४७० रु. या सह अचलपूर चांदूर बाजार,मोर्शी , वरुड, दर्यापूर,अंजनगाव ,धारणी, चिखलदरा अमरावती तिवसा भातकुली तालुक्यातील शेतकऱ्यांना अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसान भरपाई मिळणार आहे आमदार प्रतापदादा अडसड यांच्या प्रयत्नामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे

# खड्ड्यांत बसून निषेध : प्रहार संघटना आक्रमक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील रस्त्यावरील खड्ड्यांविरोधात आज प्रहार जनशक्ती पक्ष आक्रमक झाला. खड्ड्यात साचलेल्या पाण्यात बसून आणि 'बेशरम' चे झाड लावून बांधकाम विभागाचा जोरदार निषेध करण्यात आला.

प्रहार संघटनेने स्पष्ट इशारा दिला की, जर लवकरात लवकर खड्डे बुजवले नाहीत, तर बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष खड्ड्यात बसवू. जिल्हाधिकारी कार्यालय ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आणि पुढे पंचवटीकडे जाणाऱ्या सुमारे २०० मीटरच्या रस्त्यावर २०० पेक्षा अधिक खड्डे असल्याचा संघटनेचा आरोप आहे.या खड्ड्यांमुळे अपघातांची संख्या वाढली असून, नागरिकांना दररोज मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यामुळे संतप्त कार्यकर्त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

# धारणीत तापी नदी वर मेगा रिचार्ज...एकही गाव बुडीत क्षेत्रात जात नसल्याचा प्रशासनाचा दावा

## अफवांचा बाजार थांबणार का? माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत खुलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८धारणी**

धारणीतील तापी मेगा रिचार्ज प्रकल्पाबाबत मेलघाटातील जनतेमध्ये असलेल्या सर्व अफवा व भीतींना आता पूर्णविराम मिळाला आहे. नुकतीच अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयात भाजपा मेलघाट जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत प्रशासनाने दावा केला की या प्रकल्पामुळे कोणतेही बुडीत क्षेत्रात जाणार नाही आणि कोणत्याही कुटुंबाचे स्थलांतर होणार नाही. त्यामुळे पुनर्वसनाची गरजच नसल्याने स्थानिक जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे.

**प्रशासनाची हमी : कोणतेही विस्थापन होणार नाही**

जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता ठाकरे यांनी



व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे प्रकल्पाचा तांत्रिक तपशील सादर करताना स्पष्ट केले की हा प्रकल्प पूर्णपणे सुरक्षित आहे. डूब क्षेत्रात एकही गाव येणार नाही, त्यामुळे मेलघाटातील कोणाचेही घर उद्ध्वस्त होणार नाही.

**धारणी येथे सर्वपक्षीय बैठक**

मुख्य बैठकीपूर्वी धारणी येथे तापी लोकमंच, शेतकरी प्रतिनिधी व सामाजिक संघटनांची सर्वपक्षीय बैठक झाली. यामध्ये मेलघाटातील आदिवासीबहुल गावांतील नागरिकांनी आपले प्रश्न व चिंता थेट भाजपा जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर यांच्यासमोर मांडल्या. त्यांनी त्या मुद्द्यांना प्रशासना समोर सादर केले आणि त्यावर सविस्तर चर्चा झाली.

**पारदर्शक योजना, जनसहभागावर भर**

प्रशासनाने स्पष्ट केले की हा प्रकल्प पूर्णपणे पारदर्शक आणि जनसहभागावर आधारित आहे. निर्णय प्रक्रियेत स्थानिक नागरिकांची सक्रीय भूमिका सुनिश्चित केली जाईल.

या महत्त्वपूर्ण बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, पालकमंत्र्यांचे विशेष कार्याधिकारी चौधरी, माजी जिल्हा परिषद सदस्य सदाशिव खडके, भाजपचे श्याम गंगराळे आदिवासी संघटनेचे सुरेश पटेल रामगोपाल मावसकर यांच्यासह अनेक नागरिक व अधिकारी उपस्थित होते.

**मेलघाटच्या विकासासाठी सकारात्मक संदेश**

प्रशासनाच्या या स्पष्ट आश्वासनानंतर हे सिद्ध झाले आहे की तापी मेगा रिचार्ज प्रकल्प मेलघाटच्या विकासासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल असेल - तेही कोणत्याही विस्थापनाविना. हा उपक्रम पर्यावरणीय दृष्टिकोनातून समतोल असून, आदिवासीबहुल भागाच्या हिताचे रक्षण करणारा आहे.

> तापी मेगा रिचार्ज प्रकल्पाबाबत पसरलेल्या सर्व गैरसमजुती आता दूर झाल्या आहेत. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की मेलघाटात कोणतेही विस्थापन होणार नाही. ही योजना संपूर्ण सुरक्षित आणि जनहिताची आहे.
>
> 
>
> **प्रभुदास भिलावेकर, भाजपा जिल्हाध्यक्ष, मेलघाट**

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क करा
8605948853

# निम्न पेढी प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविणार-जिल्हाधिकारी आशिष येरेकर

### आ.रवी राणा यांच्या उपस्थितीत विशेष बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**



जिल्ह्याच्या विकासात महत्वाचा असणारा निम्न पेढी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे प्रकल्पामुळे बाधीत झालेल्यांचे चांगले पुनर्वसन होणे आवश्यक आहे. त्यासाठी निम्नपेढी प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्यावर भर देण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली. जिल्हा नियोजन सभागृहात आज निम्न पेढी प्रकल्पग्रस्तांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. यावेळी आमदार रवी राणा, मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, अधिक्षक अभियंता योगेश दाभाडे, श्री. कथले, जिल्हा पुनर्वसन अधिकारी श्रद्धा उदावंत, उपजिल्हाधिकारी प्रसेनजित चव्हाण, मुद्रांक जिल्हाधिकारी विजय औतकर आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले, प्रकल्पामुळे पाच गावे बाधीत होणार आहे. बाधित कुटुंबांना शासनाचे सर्व लाभ मिळतील. जुन्या पद्धतीने भूसंपादन झालेल्यांसाठी १०० कोटींचा सानुग्रह निधी प्राप्त झाला आहे. यात हेक्टरी पाच लाख रूपयांची मदत मिळणार आहे. पुनर्वसित गावात सोयी उपलब्ध व्हाव्यात यासाठी पूर्ण प्रयत्न करण्यात येतील. प्रकल्पग्रस्तांचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात येतील. तसेच कॅम्प घेऊन प्रमाणपत्र वितरीत करण्यात येतील. नागरिकांची सहमती असल्यास निवासी संकुलाचा प्रकल्प राबवून नागरिकांना किमान ५०० चौरस फूटाची जागा देण्यात येतील.आमदार रवी राणा यांनी राज्य शासनाच्या पुढाकाराने कृषी विभागाची जमीन घेऊन बाधीत गावांचे पुनर्वसन करण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान, सरळ खरेदीचे लाभ देण्यात येत आहे. तसेच पुनर्वसित गावात नागरिकांना जागा देऊन घरकुल योजनेत घर बांधून देण्यात येणार आहे. त्यामुळे तातडीने पुनर्वसन होणाऱ्या जागेवर जाऊन जमिनीचा ताबा घेणे आवश्यक आहे. या गावात जिल्हा नियोजनमधून निधी देऊन मूलभूत सुविधा देण्यात येतील. यामधून पाणी, रस्ते, विजेची सोय होऊ शकेल. चांगल्या दर्जाच्या सोयी निर्माण व्हाव्यात यासाठी प्रत्येक पुनर्वसित गावांना मूलभुत सोयींसाठी निधी देण्यात येणार आहे.सुरवातीला निम्न पेढी प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यात आले. यात बाधितांना देण्यात येणाऱ्या सुविधांबद्दल माहिती दिली. तसेच नागरिकांचे पुनर्वसनाबाबत मत जाणून घेण्यात आले. यावेळी नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यात आले.

# सण-उत्सव 'कॅश' करण्यासाठी मोजावी लागणार 'कॅश'

### स्थानिक निवडणुकांसाठी मोर्चे बांधणी सुरू; इच्छुकांना सणवार पडणार महागात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका होणार हे स्पष्ट झाले असून शासन-प्रशासनाकडून तयारी सुरू झाली आहे. तर इच्छुकांनीही आपापल्या परीने मोर्चे बांधणी सुरू केली आहे. दरम्यानच्या काळात येणारे सण-उत्सव हे मात्र इच्छुकांची आर्थिक दमछाक करणारे ठरणार आहेत. सण-उत्सवातून जनसंपर्काची भक्कम संधी लाभते. अशात हे सण-उत्सव करण्यासाठी 'कॅश' मात्र इच्छकांना 'कॅश' मोजावी लागणार आहे.



येत्या दिवाळीच्या काळात स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. तसे संकेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. त्यादृष्टीने शासन-प्रशासनाकडून निवडणुकीची तयारी सुरू झाली असतानाच राजकीय पक्षसुद्धा कामाला लागले आहेत. मात्र, या काळात अनेक धार्मिक सण-उत्सव येऊ घातले आहेत. नगर परिषद निवडणुकीत इच्छुक असलेल्या उमेदवारांनी आपापल्या परीने जनसंपर्क, सार्वजनिक कार्यक्रमांमधून सहभाग, समस्या निराकरणासाठी पुढाकार, तरुणवर्गाला आकर्षित करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम आदींना सुरुवात केली आहे. दरम्यान, या काळात येणारे सण-उत्सवदेखील इच्छुक कॅश करण्यासाठी धडपडतात. मात्र, हे सण उत्सव कॅश करण्यासाठी मोठी 'कॅश' देखील खर्च करावी लागते.सध्या श्रावण सुरू असून श्रावणात कावडयात्रेचे क्रेज सध्या प्रत्येकच गल्लीबोळात पोहोचले आहे. या उत्सवात शहरातील तरुणाई मोठ्या संख्येने सहभागी होत असून दिवसेंदिवस त्यांची संख्या वाढतीच आहे. एका कावडीत १०० ते एक हजार अशा तरुणांचासहभाग असतो तर अशा शेकडो कावडी शहरातून निघतात. त्यामुळे या उत्सवात आपल्या नावाचा बोलबाला असावाम्हणून इच्छुकांना तेथे खर्चही करावा लागणार आहे. कुणी कावधारींच्या फराळाची तर कुणी त्यांच्या जलपानाची व्यवस्था करतात. तर कुणी त्यांना टी-शर्ट, लोअर, कावड साहित्य आदींचे वितरणदेखील करतात.

**मंडळ व कार्यकर्त्यांची चांदी**

आता निवडणूक लढायची असल्याने आपल्या प्रभागातील नागरिकांना नाराज करणे इच्छुकांसाठी भारी पडू शकते. अशात त्यांना सर्वांनाच घेऊन चालायचे आहे. प्रत्येकच प्रभागात कावड, जन्माष्टमी, गणेशोत्सव, दुर्गा-शारदा मातेची स्थापना असतेच.या उत्सवांमध्ये तरुणाई सहभागी होत असल्याने त्यांना नाराज करणे महागात पडू शकते. तर निवडणुकीची ही संधी साधून या मंडळांकडूनही दाबून वर्गणी वा अन्य उपहार वा भेट इच्छुकांकडूनकाढून घेतले जाते. यामुळे मंडळ व कार्यकर्त्यांची चांदी होणार असतानाच इच्छुकांची मात्र चांगलीच फजिती होणार आहे.म्हणून इच्छुकांना तेथे खर्चही करावा लागणार आहे. कुणी कावडधारींच्या फराळाची तर कुणी त्यांच्या जलपानाची व्यवस्था करतात. तर कुणी त्यांना टी-शर्ट, लोअर, कावड साहित्य आदींचे वितरणदेखील करतात.